मंगळवार, १८ जानेवारी २०२२
राम प्रहर
◆ वर्ष १४ ◆ अंक १८२
www.ramprahar.com
◆ पाने ६ ◆ किंमत ₹ २ ◆ रायगड

अंतरंग

पनवेलमध्ये विविध विकासकामांचा शुभारंभ/२
सहा नगरपंचायतींसाठी रायगडात आज मतदान/५
रोहित शर्मा नवा कसोटी कर्णधार?/६

## प्रजासत्ताक दिनी भारत जगाला दाखवणार हवाई ताकद



**नवी दिल्ली :** २६ जानेवारी २०२२ रोजी भारताच्या ७२व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त हवाई दलात अलीकडेच सामील झालेल्या राफेल विमानासह भारतीय संरक्षण दलांची तब्बल ७५ विमाने राजपथावरून उड्डाण करणार आहेत. एकंदरीतच यंदाच्या प्रजासत्ताक दिनाचा सोहळा भव्यदिव्य करण्याची योजना सरकारने आखली आहे. प्रजासत्ताक दिनाच्या परेडदरम्यान हवाईदल, भूदल आणि नौदलाच्या ७५ विमानांसह राजपथवर आतापर्यंतचा सर्वात भव्य फ्लायपास्ट होईल. 'आझादी का अमृत महोत्सव'अंतर्गत हे भव्य उड्डाण होणार असल्याचे विंग कमांडर इंद्रनील नंदी म्हणाले. फ्लायपास्ट हा प्रजासत्ताक दिनाच्या परेडचा एक महत्त्वाचा भाग आहे. राफेल, भारतीय नौदलाची मिग २९ आणि पी-८आय विमाने, जग्वार लढाऊ विमाने परेडमध्ये आपले सामर्थ्य दाखवतील.

# ज्येष्ठ नेते एन. डी. पाटील कालवश



**कोल्हापूर : प्रतिनिधी**

**शेतकरी, कामगार चळवळींचे अग्रणी ज्येष्ठ नेते, रयत शिक्षण संस्थेचे माजी चेअरमन प्राध्यापक नारायण ज्ञानदेव तथा एन. डी. पाटील यांचे सोमवारी (दि. १७) कोल्हापुरात खाजगी रुग्णालयात वयाच्या ९३ व्या वर्षी निधन झाले. मंगळवारी (दि. १८) कोल्हापूरमधील राजर्षी छत्रपती शाहू कॉलेजच्या (कदमवाडी रोड, सदरबाजार) मैदानावर सकाळी ८ ते १ या वेळेत त्यांचे पार्थिव अंत्यदर्शनासाठी ठेवण्यात येणार आहे. कोरोनाच्या नियमांमुळे अंत्ययात्रा निघणार नाही. त्यानंतर दुपारी १च्या सुमारास बावडा स्मशानभूमीत शासकीय इतमामात त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात येतील.**

वातावरणात बदल झाल्याने त्यांना थोडी अस्वस्थता वाटत होती. त्यामुळे त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले. कोरोनाच्या दुसऱ्या लाटेत त्यांना कोरोनाचा संसर्गदेखील झाला होता, परंतु या वयातदेखील त्यांनी कोरोनावर यशस्वीपणे मात केली होती. एक झुंजार नेतृत्व अशी त्यांची ओळख होती. कामगार, शेतकरी यांच्या अनेक प्रश्नांसाठी ते कायम लढत राहिले. **(पान २ वर..)**





शेतकरी कामगार पक्षाचे ज्येष्ठ नेते प्रा. एन. डी. पाटील यांच्या निधनाने कोल्हापूरच्या चळवळीच्या इतिहासातील एक मोठे नाव इतिहासजमा झाले आहे. कोणाचीही भीडभाड न ठेवता सामान्य माणसासाठी पोटतिडकीने लढणारा नेता आपण गमावला असून त्यांच्या निधनाने निर्माण झालेली पोकळी भरून काढणे अशक्य आहे. एन. डी. पाटील म्हणजे अन्यायाच्या विरोधात संघर्ष अशी स्थिती होती. संघर्षाला पर्यायी शब्द एन. डी. पाटील होते. कोल्हापूर टोलसारखे मोठमोठे विषय मार्गी लावणारे आणि सर्वसामान्य माणसांसाठी लढणारे एक मोठे नेतृत्व एन. डी. पाटील यांच्या निधनाने गमावले आहे. त्यांच्या संघर्षाचा वसा तरुण पिढीने पुढे चालविला पाहिजे.

**-चंद्रकांत पाटील,** भाजप प्रदेशाध्यक्ष

## 'एका तपस्वी नेत्याचे निधन'



एन. डी. पाटील यांचे वयाच्या ९३व्या वर्षी दुःखद निधन झाल्याची बातमी आली. एक अतिशय तपस्वी वृत्तीचा नेता, कोणालाही कधीही न घाबरता आपल्या मनामध्ये जे आहे ते बोलणारा नेता, गोरगरिबांची सर्व वर्गातील लोकांची कणव असलेला नेता आज वयाच्या ९३व्या वर्षी आपल्यातून गेला. याचे अतिशय दुःख होत आहे. माझा त्यांचा परिचय ४०-४५ वर्षाचा आहे. माझे सासरे जनार्दन भगत, त्या वेळचे आमचे नेते दि. बा. पाटील साहेब यांच्या नेतृत्वाखाली मी काम करीत होतो. त्या वेळी एन. डी. पाटील साहेब कापड गल्लीतील छोट्याशा कार्यालयात व गव्हाण गावात येत असत. आमच्या सासऱ्यांकडे, आमच्या भागात येत असत. १९६७च्या दुष्काळापासून त्यांना मी जवळून ओळखतो. तेव्हापासूनचे सुरू असलेले त्यांचे कामाचे व्रत आज शेवटच्या क्षणापर्यंत सुरू होते. **(पान २ वर..)**



प्रा. एन. डी. पाटील हे प्रदीर्घकाळ शेकापचे सरचिटणीस आणि रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन होते. दोन्ही ठिकाणी काम करीत असताना त्यांनी सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रात मोलाची भूमिका बजावली. कोणत्याही आंदोलनात उतरताना समाजासाठी त्यांनी आपली पूर्ण ताकद वापरली आणि शेवटच्या निकालापर्यंत ते कायम लढत राहिले. महाराष्ट्रात कुठेही अन्याय झाला तर शेतकरी आणि सामान्य माणसासाठी ते त्या अन्यायाविरोधात कायमच उभे राहिले. ओघवती वक्तृत्व शैली आणि सर्वसामान्यांचा कैवार घेण्याची उपजत प्रवृत्ती यामुळे ते महाराष्ट्रातील गोरगरीब जनतेचे आशास्थान बनले होते. आपल्या सर्व आयुष्यात त्यांनी सर्व लढे निष्ठेने, प्रामाणिकपणे आणि अखंडपणे लढले.

**-आमदार प्रशांत ठाकूर, जिल्हाध्यक्ष, उ. रायगड भाजप**



शेतकरी कामगार पक्षाचे माजी सरचिटणीस आणि संयुक्त महाराष्ट्र चळवळीचे प्रमुख नेते प्रा. एन. डी. पाटील साहेब यांचे निधन झाल्यामुळे महाराष्ट्राची मुलूखमैदान तोफ शांत झाली आहे. महाराष्ट्राच्या पुरोगामी विचारसरणी आणि भल्यासाठी त्यांनी नेहमीच प्रयत्न केले आहेत, तसेच लोकशाही चळवळी जिवंत राहाव्यात, सामान्य शेतकरी, कामगार यांना चांगले दिवस यावेत यासाठी त्यांनी संपूर्ण जीवनभर खस्ता खाल्ल्या. अशा एन. डी. पाटील यांच्या जाण्याने पुरोगामी चळवळीला मोठे नुकसान झाले आहे. ही चळवळ पुढे टिकावी यासाठी तरुणांनी प्रयत्न करणे आवश्यक आहे.

**-परेश ठाकूर,** सभागृह नेते, पनवेल महानगरपालिका



# शेतकरी लढ्यातील हुतात्म्यांना पागोटे, चिर्ले येथे अभिवादन



**उरण : रामप्रहर वृत्त**

गौरवशाली शेतकरी लढ्यातील हुतात्म्यांच्या ३८व्या स्मृतिदिनाचा कार्यक्रम सोमवारी (दि. १७) पागोटे येथे झाला. या वेळी भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी हुतात्म्यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. १९८४ साली उरण तालुक्यात झालेल्या गौरवशाली शेतकरी लढ्यात पाच हुतात्मे झाले होते. त्यातील तीन हुतात्मे पागोटे येथील होते.

उरण तालुक्यात १९८४ साली शेतकऱ्यांचा गौरवशाली लढा झाला होता. त्या लढ्यात उरण तालुक्यातील शेतकऱ्यांनी मोलाचे योगदान दिले होते. या लढ्यात पागोटे येथील हुतात्मा महादेव हिरा पाटील, हुतात्मा केशव महादेव पाटील, हुतात्मा कमळाकर कृष्णा तांडेल हे हुतात्मे झाले होते. त्यांचा स्मृतिदिन दरवर्षी हुतात्मा दिन म्हणून साजरा करण्यात येतो.

या वेळी भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, उरणचे आमदार महेश बालदी, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत, कॉम्रेड भूषण पाटील, **(पान २ वर..)**

## निवडक

### कथ्थकसम्राट पंडित बिरजू महाराज यांचे निधन

**दिल्ली :** भारतासह जगभरात आपल्या कथ्थक नृत्यासाठी प्रसिद्ध असलेल्या पद्मविभूषण पंडित बिरजू महाराज यांचे रविवारी (दि. १६) रात्री उशिरा निधन झाले. बिरजू महाराज यांना १९८३ मध्ये भारत सरकारने पद्मविभूषण पुरस्काराने गौरवले होते. पद्म पुरस्काराशिवाय बिरजू महाराज यांना संगीत नाटक अकादमी पुरस्कार आणि कालिदास पुरस्कारानेही गौरवण्यात आले आहे.

### अबूधाबीतील हल्ल्यात दोन भारतीयांचा मृत्यू

**अबूधाबी :** अबूधाबीच्या नव्या विमानतळावर सोमवारी (दि. १७) हल्ला झाला असून तो ड्रोनमधून करण्यात आल्याचे सांगितले जातेय. या हल्ल्यामध्ये दोन भारतीयांचा मृत्यू झाला आहे. इराणमधील हैती बंडखोरांनी या हल्ल्याची जबाबदारी घेतली आहे. अबूधाबीच्या आंतरराष्ट्रीय विमानतळावर सोमवारी दोन स्फोट झाले. या हल्ल्यामध्ये दोन भारतीय प्रवाशांसह एका पाकिस्तानी प्रवाशाचा मृत्यू झाला. तर इतर सहा जण जखमी झाले आहेत, यूएईतील भारतीय राजदूत संजय सुधीर यांनी याला दुजोरा दिला.

(छाया : दिनेश पवार)



# शिवसेना, काँग्रेस, शेकापचे कार्यकर्ते भाजपत

## आमदार महेश बालदी यांनी केले पक्षात स्वागत

**उरण : वार्ताहर**

उरणचे आमदार महेश बालदी यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेऊन उरण तालुक्यातील केगाव ग्रामपंचायत हद्दीतील शिवसेना, काँग्रेस व शेकापच्या कार्यकर्त्यांनी भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश केला आहे.

केगाव आवेडा शिवसेना उपशाखाप्रमुख लक्ष्मण पाटील, प्रभाग क्रमांक २च्या शिवसेना महिला उमेदवार कृपाली गणेश म्हात्रे, गणेश म्हात्रे, काँग्रेसचे ज्येष्ठ कार्यकर्ते चंद्रकांत पाटील, शेकापचे प्रभाकर पाटील, सुदेश कासेकर यांनी आमदार महेश बालदी यांच्या उपस्थितीत भाजपमध्ये प्रवेश केला.

या वेळी भाजप तालुकाध्यक्ष रवी भोईर, तालुका सरचिटणीस सुनील पाटील, चाणजे विभाग अध्यक्ष तथा उद्योजक जितेंद्र घरत, केगाव अध्यक्ष अंकीत म्हात्रे, ग्रामपंचायत सदस्य अविनाश पाटील, अरविंद पवार, अक्षय अशोक पाटील, उदय म्हात्रे, गणेश पाटील, अतीश हुजरे, मिथुन पुरव, विराज म्हात्रे आदी उपस्थित होते.

## पंजाबमध्ये मतदानाची तारीख पुढे ढकलली

### २० फेब्रुवारीला होणार मतदान

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

पंजाब विधानसभा निवडणुकांसाठी १४ फेब्रुवारी रोजी मतदान होणार होते, परंतु पंजाब सरकारच्या विनंतीवरून निवडणूक आयोगाने आता राज्यात २० फेब्रुवारीला मतदान घेण्याचा निर्णय घेतला आहे. राज्य सरकार आणि विविध राजकीय पक्षांनी निवडणुकीची तारीख पुढे ढकलण्याची विनंती केली होती. ती विनंती स्वीकारत निवडणूक आयोगाने नवीन तारीख दिली आहे. विशेष म्हणजे पंजाबमधील सर्व ११७ जागांसाठी १४ फेब्रुवारीला एकाच टप्प्यात मतदान होणार होते. ते मतदान आता २० तारखेला होईल.

मुख्यमंत्री चरणजीत सिंग चन्नी, भाजपचे सरचिटणीस सुभाष शर्मा, पंजाब लोक काँग्रेसचे कॅप्टन अमरिंदर सिंग यांनी निवडणूक आयोगाला पत्र लिहून गुरू रविदास जयंतीनिमित्त १४ फेब्रुवारीच्या विधानसभा निवडणुका सहा दिवस पुढे ढकलण्यात याव्यात, अशी मागणी केली होती. मतदानाच्या दोन दिवसांनी १६ फेब्रुवारीला रविदास जयंती आहे. रविदास जयंतीनिमित्त १० ते १६ फेब्रुवारी रोजी ३२ टक्के लोकसंख्येचा समावेश असलेल्या अनुसूचित जाती समुदायातील लोक मोठ्या संख्येने वाराणसीला जातात. अशा परिस्थितीत निवडणुकीत अनेकांना मतदान करता येणार नाही.

## काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोलेंचे पंतप्रधानांविषयी भयंकर वक्तव्य

### विरोधी पक्षनेते प्रवीण दरेकर यांची चौकशीची मागणी



**मुंबई : प्रतिनिधी**

काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी नगरपंचायत निवडणुकीच्या प्रचारादरम्यान केलेल्या एका वक्तव्यामुळे वादळ निर्माण झाले आहे. 'मी मोदींना मारू शकतो, शिव्याही देऊ शकतो,' अशा आशयाचे वक्तव्य करतानाचा नाना पटोले यांचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. या व्हिडिओवर काँग्रेसकडून अद्याप स्पष्टीकरण देण्यात आलेले नाही. हा व्हिडिओ खरा आहे किंवा खोटा, याबाबत अद्याप पुष्टी झाली नसली, तरी त्यावरून मोठा वाद निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते प्रवीण दरेकर यांनी नाना पटोले यांना लक्ष्य केले आहे. नाना पटोले यांचे मोदींविषयीचे वक्तव्य भयंकर आहे. याप्रकरणाची चौकशी झाली पाहिजे, अशी मागणी प्रवीण दरेकर यांनी केली.

राजकारणात आपण एखाद्याला बोलू शकतो इथपर्यंत ठीक आहे. पण कोणाला मारू शकतो, हे वक्तव्य गंभीर आहे. देशाचा पंतप्रधान किंवा मुख्यमंत्री हे एका पक्षाचे नसतात, संपूर्ण देशाचे असतात. त्यामुळे त्यांच्याकडे राजकारण आणि तिरस्काराच्या दृष्टिकोनातून बघणे योग्य नसते. नाना पटोले प्रदेशाध्यक्ष असल्यामुळे त्यांचे वक्तव्य वैयक्तिक नव्हे तर पक्षाचे वक्तव्य ठरते. यानिमित्ताने काँग्रेसच्या पोटातील खदखद बाहेर आली आहे का, याचा विचार झाला पाहिजे. भाजप याला योग्य प्रत्युत्तर देईल. याप्रकरणाची चौकशी झाली पाहिजे, अशी मागणी प्रवीण दरेकर यांनी केली.

# आंतरराष्ट्रीय कुस्ती स्पर्धेसाठी पनवेलच्या रूपेश पावशेची निवड



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

येथील पैलवान रूपेश पावशे याची नेपाळमधील पोखरा येथे ६ ते ९ फेब्रुवारीदरम्यान होणाऱ्या आंतरराष्ट्रीय कुस्ती स्पर्धेसाठी निवड झाली आहे. ही स्पर्धा एशियन स्पोर्ट्स अ‍ॅण्ड फिजिकल फिटनेस बोर्डच्या सहकार्याने आयोजित करण्यात आली आहे.

श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचा पैलवान असलेला रूपेश पावशे हा पनवेल तालुक्यातील नितळस गावचा असून चांगू काना ठाकूर (सीकेटी) महाविद्यालयात क्रीडा शिक्षक आहे. रूपेशने यापूर्वी स्पोर्ट्स अ‍ॅण्ड फिजिकल फिटनेस बोर्डच्या वतीने आग्रा येथे घेण्यात आलेल्या राष्ट्रीय कुस्ती स्पर्धेत सुवर्णपदक पटकाविले होते. आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाल्याबद्दल आमदार प्रशांत ठाकूर यांनी पैलवान रूपेशचे अभिनंदन केले आणि शुभेच्छा दिल्या. या आंतरराष्ट्रीय कुस्ती स्पर्धेत सुवर्णपदक मिळविण्याचा पुरेपूर प्रयत्न करेन, असे पैलवान रूपेश पावशे याने प्रतिक्रिया देताना सांगितले.

## राज्यात कोरोनाचे ३१ हजार नवे रुग्ण

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्रात सोमवारी (दि. १७) नव्याने ३१ हजार १११ कोरोना रुग्ण आढळले. यासह राज्यातील एकूण कोरोना रुग्णांची संख्या ७२ लाख ४२ हजार ९२१ इतकी झाली आहे, तर २४ रुग्णांचा कोरोनामुळे मृत्यू झाला आहे.

यासह एकूण कोरोना मृत्यूंची संख्या एक लाख ४१ हजार ८३२ इतकी झालीय. राज्यातील मृत्युदर १.९५ टक्के एवढा आहे. दुसरीकडे राज्यात सोमवारी २९ हजार ९२ रुग्ण उपचारानंतर बरे होऊन घरी परतले. आजपर्यंत एकूण ६८ लाख २९ हजार ९९२ करोना बाधित रुग्ण बरे होऊन घरी परतले आहेत. यामुळे राज्यातील रुग्ण बरे होण्याचे प्रमाण ९४.३ टक्के झाला आहे.



# पनवेलमध्ये विविध विकासकामांचा शुभारंभ





## भाजप तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते भूमिपूजन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पक्षाचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली पनवेल तालुक्याचा सर्वांगीण विकास होत आहे. त्यानुसार सोमवारी (दि. १७) पनवेल तालुक्यात आमदार प्रशांत ठाकूर यांच्या स्थानिक विकास निधी आणि डीपीडीसीच्या निधीमधून करण्यात येणाऱ्या सुमारे ६१ लाख रुपयांच्या कामांचा शुभारंभ झाला. या कामांचे भाजपचे पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते भुमिपूजन करण्यात आले.

पनवेल तालुक्यात भारतीय जनता पक्षाच्या माध्यमातून विकास कामांचा झंझावात सुरू आहे. त्यानुसार आमदार प्रशांत ठाकूर यांच्या स्थानिक विकास निधीमधून बापदेववाडी येथे रस्त्याचे डांबरीकरण करण्यासाठी आठ लाख, शिवणसई येथे नवीला घाट बांधण्यासाठी आठ लाख, आंबे तर्फे वाजे आदिवासीवाडीमध्ये रस्ता काँक्रिटीकरणासाठी आठ लाख, दुंदरे येथे अंतर्गत रस्ता काँक्रिटीकरणासाठी आठ लाख, चेरवली येथे रस्ता डांबरीकरणासाठी १० आणि बकुळवाडी येथे रस्ता डांबरीकरण तीन लाख रुपये खर्चून करण्यात येत आहे. तसेच शिरवली येथे डीपीडीसीचा १६ लाख रुपये निधी खर्चून साकव बांधण्यात येत आहे. या विकास कामांचे भूमिपूजन करण्यात आले.

या वेळी भाजपचे पनवेल तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, पनवेल पंचायत समिती सदस्य भुपेंद्र पाटील, माजी सरपंच तुकाराम पाटील, माजी उपसरपंच गणेश रंधवी, सदस्य बाळाराम पाटील, ज्येष्ठ कार्यकर्ते गुलाब रंधवी, भगवान खानावकर, सुरेश खानावकर, सिताराम रंधवी, राम पाटील, केशव खानावकर, दीपक खानावकर, जयदास पाटील, सुनील पाटील, जितेश रंधवी, अभिजित पाटील, जनार्दन उलवेकर, मधुकर पाटील, रोशन उलवेकर, दुंदरेचे सरपंच अनुराधा वाघमारे, सदस्य शांताराम चौधरी, शत्रुघ्न उसाटकर, भिमा गोसावी, सदस्य किशोर पाटील, मनोहर पवार, बाळाराम पालांडे, भगवान वाघमारे, वाजेचे सरपंच राजेंद्र भालेकर, उपसरपंच रेवन पाटील, तंटामुक्ती अध्यक्ष राघो पाटील, ग्रामपंचायत सदस्य गणेश पाटील, माजी सरपंच राजा भोईर, ग्रामपंचायत सदस्य पदु वाघ, श्याम भालेकर, बुधाजी हंभीर, मंगेश कांबडी, राघो खैर, पिंट्या वाघ, मधु खैर, दिपील पाटील, महादु सांबरी, सिताराम सांबरी, रघुनाथ सांबरी, राम सांबरी, विष्णू सांबरी, महेंद्र सांबरी, बाळु सांबरी, धर्मा सांबरी, अल्या सांबरी, बाळु दोरे, रामा भस्मा, कृष्णा दोरे, स्वप्नील पाटील, ओमकार पाटील आदी उपस्थित होते.

# रायगडातील ४९२ गावांत शंभर टक्के नळजोडणी

## केंद्र सरकारच्या 'जलजीवन मिशन'ची प्रभावी अंमलबजावणी

**अलिबाग : प्रतिनिधी**

प्रत्येक घरात नळाने पाणीपुरवठा करण्यासाठी केंद्र शासनाने जलजीवन मिशन हाती घेतले आहे. रायगड जिल्हा परिषदेच्या माध्यमातून ग्रामीण भागात जलजीवन मिशनची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत असून, रायगड जिल्ह्यातील ४९२ महसुली गावांमधील १०० टक्के घरांना नळजोडण्या देण्यात आल्या आहेत. त्यामुळे ही गावे हर घर जल गाव म्हणून घोषित करण्याची कार्यवाही सुरू करण्यात आली आहे. विशेष म्हणजे उरण तालुक्यातील १०० टक्के म्हणजे ५४ गावांमधील सर्व घरांना नळ कनेक्शन देण्यात आले आहेत.

केंद्र सरकारने जलजीवन मिशन हाती घेतले आहे. या अंतर्गत २०२४ पर्यंत प्रत्येक घरात नळाने पाणीपुरवठा करण्याचे नियोजन आहे. या योजनेच्या माध्यमातून सुरुवातीला ज्या घरांमध्ये नळ कनेक्शन आहे, त्या घरांची माहिती संकलित करण्यात आली. त्यानंतर दुसऱ्या टप्प्यात ज्या घरांमध्ये वैयक्तिक नळ कनेक्शन नाही, अशा घरांना नळ कनेक्शन देण्यात येत आहे.

रायगड जिल्ह्यात जलजीवन मिशन यशस्वी करण्यासाठी जिल्हा परिषद सदस्य, अधिकारी, कर्मचारी यांचे सहकार्य लाभत आहे. तसेच जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील, पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता एस. पी. वेंगुर्लेकर, पाणी व स्वच्छता विभागाच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. ज्ञानदा फणसे यांच्या मार्गदर्शनाखाली अधिकारी, कर्मचारी योग्य नियोजन करून योजना प्रभावीपणे राबवित आहेत.

नव्याने घर बांधले असेल त्यांनी किंवा एखादे कुटुंब कामानिमित्त स्थलांतरित असेल तर अशा कुटुंबांनी प्रशासनासोबत संपर्क साधून नळजोडणीची मागणी करावी, असे आवाहन रायगड जिल्हा परिषदेतर्फे करण्यात आले आहे.

रायगडातील अलिबाग ४२, कर्जत २४, खालापूर ४०, महाड ४४, म्हसळा ५०, मुरूड १४, पनवेल ६९, पेण १७, पोलादपूर १०, सुधागड ११, तळा १०, उरण ५४, रोहा ४५, माणगाव ५०, श्रीवर्धन १२ या तालुक्यांतील गावांमध्ये शंभर टक्के नळजोडणी झाली आहे.

**जलजीवन मिशन अंतर्गत संपूर्ण जिल्ह्यात घराघरात नळ कनेक्शन देण्यात येणार असून, जिल्ह्यातील ४९२ महसुली गावांमधील १०० टक्के घरांना नळ कनेक्शन देण्यात आले आहे. या सर्व गावांना हर घर नळ गाव घोषित करण्याची कार्यवाही सुरू करण्यात आली आहे. तसेच इतर गावांमध्ये ज्या कुटुंबाला वैयक्तिक नळ कनेक्शन नाही त्या कुटुंबांना नळ कनेक्शन देण्याची कार्यवाही सुरू आहे.**

**–डॉ. किरण पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद रायगड**

# शिवरायांच्या अमरावतीतील पुतळ्याची सन्मानपूर्वक प्रतिष्ठापना करा -उपाध्ये

**मुंबई : प्रतिनिधी**

अमरावतीमध्ये पोलिसांनीच छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा हटविल्यामुळे महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेल्या शिवरायांविषयीचे राज्य सरकारचे प्रेम बेगडी असल्याचे उघड झाले असून हा पुतळा अनधिकृत असल्याचे कारण देत तो हटविण्याऐवजी, त्याची तातडीने सन्मानाने अधिकृतपणे स्थापना करावी, अशी मागणी भाजपचे मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये यांनी सोमवारी (दि. १७) केली. भाजप प्रदेश कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. भाजप किसान मोर्चाचे राष्ट्रीय सरचिटणीस डॉ. अनिल बोंडे या वेळी उपस्थित होते.

उपाध्ये यांनी सांगितले की, अमरावतीमध्ये राजमाता जिजाऊ यांच्या जन्मदिनी शिवप्रेमींनी स्थापना केलेला शिवरायांचा पुतळा अनधिकृत असल्याचे कारण देत तो हटविण्याऐवजी त्याची सन्मानपूर्वक योग्य त्या जागी अधिकृतपणे स्थापना करणे महाराष्ट्राच्या परंपरेस साजेसे झाले असते, पण शिवप्रेमाचे मुखवटे चढवून प्रत्यक्षात मात्र राजकारण करणाऱ्या सरकारच्या यंत्रणेने आपला खरा चेहरा उघड केला आहे. हा पुतळा हटविताना प्रचंड पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. एवढा बंदोबस्त अमरावतीत निघालेल्या रझा अकादमीच्या मोर्चा वेळी ठेवला असता तर अमरावतीत दंगल झाली नसती असेही त्यांनी सांगितले.

# पेणमध्ये एटीएमवर दरोडा; ५६ लाख लुटून चोर पसार

**पेण : रामप्रहर वृत्त**

शहरातील स्टेट बँक ऑफ इंडियाच्या एटीएम सेंटरवर दरोडा पडल्याची घटना उघडकीस आली आहे. दरोडेखोरांनी एटीएममधून ५६ लाखांची रोकड लंपास करून पोबारा केला. या दरोड्याच्या घटनेने पोलिसांसमोर मोठे आव्हान उभे ठाकले आहे.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, पेण शहरातील सनसिटी इमारतीमध्ये स्टेट बँक ऑफ इंडियाचे एटीएम सेंटर आहे. या एटीएम सेंटरवर दरोडा पडला. दरोडेखोरांनी तब्बल ५६ लाख ३४ हजार ८०० रुपये लांबवले. दरोड्याच्या घटनेची माहिती मिळताच, पेण पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. तपासासाठी फॉरेन्सिक पथकालाही पाचारण करण्यात आले. या प्रकरणाचा तपास करून नक्कीच दरोडेखोरांना पकडण्यात यश मिळेल, असे अतिरिक्त पोलीस अधीक्षक अतुल झेंडे यांनी सांगितले.

# महाडमध्ये पावणेचार लाखांचा मद्यसाठा जप्त; दोघांना अटक

**महाड, पोलादपूर : प्रतिनिधी**

महाड उत्पादन शुल्क विभागाने बेकायदेशीर मद्य वाहतूक करणाऱ्या वाहनाचा पाठलाग करून मद्य वाहतूक करणाऱ्या दोन जणांना ताब्यात घेतले आहे. तर बेकायदेशीर मद्य साठादेखील जप्त करण्यात आल्याची माहिती प्रसिद्धी पत्रकान्वये दिली आहे.

उत्पादन शुल्क विभागाला मिळालेल्या माहितीनुसार त्यांच्या टीमने सापळा रचला. रात्री दिडच्या सुमारास एक ओमनी कार चिपळूणच्या दिशेने येताना दिसली. त्या कारला थांबवण्याचा प्रयत्न केला असता कार न थांबता महाडच्या दिशेने आली व तुर्भे येथील पुलाजवळ गोवा विदेशी मालाचे बॉक्स गाडीतून उतरवत असताना आढळून आली. याचवेळी त्यांना रंगेहात पकडण्यात आले.

यामध्ये दोन आरोपींना ताब्यात घेण्यात आले. आरोपी व्यंकटेश मधुकर महाडिक (वय ३९, रा. चिपळूण) व रमेश अनंत गायकवाड (वय ४५, रा. कुंभार आळी–महाड) यांना (एमएच ०८ सी ०२३०) ओमनी कार तसेच महाराष्ट्र विक्रीस प्रतिबंध असलेले गोवा विदेशी मद्य ४५ बॉक्ससह ताब्यात घेण्यात आले. अधिक तपास सुरू आहे.

## खालापुरात चाकूहल्ला करून एकाला लुटले

**खोपोली :** खानाव गावच्या हद्दीत मिरकुटवाडी डोणवत रोडवर दुचाकीवरून आलेल्या दोघांनी राजाबाबू विरेंद्र कुमार बिंद (रा.खालापुर, मूळ रा.उत्तर प्रदेश) याच्यावर चाकूहल्ला केला. त्यानंतर त्याच्या जवळील आठ हजार रुपयांचा मोबाइल चोरून नेल्याची घटना घडली.

राजाबाबू याला खानाव गावातील स्मशानभुमीजवळ दुचाकीवरून आलेल्या दोघांपैकी व्यक्तीने चाकुने वार करून हाताचे बोटांना दुखापत केली. या झटापटीत लुटारूंनी राजाबाबूजवळील मोबाइल जबरीने हिस्सकावुन चोरून नेला. याबाबत खालापूर पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला. त्यानुसार दोन जणांना ताब्यात घेतले आहे. दोघांनी गुन्ह्याची कबुली दिली आहे.

(छाया : विनायक माडपे)



**खोपोली : भाजपच्या ज्येष्ठ नेत्या स्नेहल सावंत यांना वाढदिवसानिमित्त रायगड जिल्हा महिला अध्यक्ष अश्विनी पाटील यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी नगरसेविका अपर्णा मोरे, माजी नगरसेविका अनिता शहा, शहर महिला सरचिटणीस अश्विनी अत्रे, मोहिते आदी कार्यकर्त्या उपस्थित होत्या.**

## पनवेल येथे अक्कलकोटहून स्वामींच्या पादुकांचे आगमन

**पनवेल : वार्ताहर**

शहरातील गावदेवी पाडा येथील स्वामी समर्थ मठात गेल्या २० वर्षांपासून अक्कलकोट येथून श्रीस्वामी समर्थांच्या पालखीचे आगमन होत असते. या वर्षीही समर्थांच्या पादुकांचे पनवेलमध्ये आगमन झाल्यावर मठाधिपती सुधाकर घरत यांनी पालखीचे स्वागत केले. स्वामींच्या पादुका दर्शनाकरिता गावदेवी पाडा येथील श्री स्वामी समर्थ मठात ठेवण्यात आल्या होत्या.

या वेळी शेकडो स्वामी भक्तांनी स्वामी दर्शनाचा लाभ घेतला. अक्कलकोट येथून पादुकांसोबत संजय कुलकर्णी गुरुजी, शावरेप्पा मानको, मल्लिकअर्जुन गवळी, बलभीम पवार आणि संतोष भोसले आणि इतर सेवेकरी या वेळी उपस्थित होते.

पान १ वरून

## ज्येष्ठ नेते एन. डी. पाटील कालवश

एन. डी. पाटील समाजवादी प्रबोधिनीचे व अंधश्रद्धा निर्मूलन प्रबोधन व विवेकवादी चळवळीचे अग्रणी असल्याने कोणत्याही कर्मकांडाशिवाय त्यांचा अंत्यविधी होणार आहे. करोनाच्या नियमांमुळे केवळ २० जणांच्या अर्थात कुटुंबीयांच्या उपस्थितीत अंत्यविधी होणार आहे. तरी कार्यकर्त्यांनी शाहू कॉलेजवर अंत्यदर्शनासाठी यावे, मात्र अंत्यविधीच्या ठिकाणी गर्दी करू नये, तसेच मास्क, फिजिकल डिस्टनसिंग आणि महाविद्यालय परिसरात पार्किंग नियमांचे पालन करावे, असे आवाहन एन. डी. पाटील यांच्या पत्नी सरोजताई ऊर्फ माई पाटील व कुटुंबीयांनी केले आहे.

दरम्यान, कदमवाडी येथील ॲपल सरस्वती हॉस्पिटलमध्ये प्रा. एन. डी. पाटील यांचे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी मंगळवारी अंत्यदर्शन घेतले.

### 'एका तपस्वी नेत्याचे निधन'

कधीही त्यांनी आजारपणाची तमा बाळगलेली नाही.

रयत शिक्षण संस्थेचे ते अनेक वर्षे चेअरमन होते. मला त्यांच्या हाताखाली शेकापत आणि रयत शिक्षण संस्थेमध्ये काम करण्याची संधी मिळाली. त्यांनी मला अतिशय प्रेम दिले. इतके प्रेम दिले की मी त्यांचा आवडता शिष्य होतो, असे म्हणायला हरकत नाही. मी पक्ष सोडून गेलो तरी त्यांचे प्रेम कमी झाले नाही. त्यांचे प्रेम माणसाच्या कामावर होते. त्यामुळेच त्यांनी मला काय करतोस असे न विचारता कोठेही मी गेलो तरी माझ्यावर प्रेम केले. त्यादृष्टीने माझा एक आवडता नेता असे एन. डी. पाटील यांच्याप्रति माझे मत आहे. मी कोणत्याही पक्षात असलो तरी माझा सगळ्यात जवळचा व आवडता नेता म्हणून फक्त एन. डी. पाटीलच आहेत. त्यांचा आदर्श घेऊनच मी माझ्या जीवनात वाटचाल करीत आहे.

**–माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर**

## शेतकरी लढ्यातील हुतात्म्यांना पागोटे, चिर्ले येथे अभिवादन

जे. डी. तांडेल, रविशेठ पाटील, महादेव घरत, सीमा घरत, दि. बा. पाटील यांचे सुपुत्र अतुल पाटील, पागोटे ग्रामपंचायतीचे सरपंच मिलिंद तांडेल, सदस्या वनिता पाटील, समीर पाटील, प्रदीप पाटील, भाजपचे पागोटे गाव अध्यक्ष आशीष तांडेल, उद्योजक जे. एम. म्हात्रे आदींसह राजकीय आणि सामाजिक क्षेत्रातील मान्यवर आणि ग्रामस्थ उपस्थित होते. या वेळी 'हुतात्मे अमर रहे' अशा घोषणा देऊन रेल्वेस्थानकाजवळ मानवंदना देण्यात आली, तसेच या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी चिर्ले येथे भेट देऊन हुतात्मा नामदेव शंकर घरत यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.


### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येत आहे की, १) श्री. दशरथ काशिनाथ पाटील २) श्री. सुनिल काशिनाथ पाटील ३) श्री. अनंत काशिनाथ पाटील यांच्या नावे असलेले मौजे मोहो, तालुका पनवेल, जिल्हा रायगड येथील खालील वर्णनाची जमीन मिळकत आमचे अशिलांनी विकत घेण्याचे ठरविलेले आहे.

**जमीन मिळकतीचे वर्णन**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्रफळ (हे.आर.) |
|---|---|---|
| ९४ | १ | १-४८-०० |
| पो.ख. | | ०-१०-०० |
| | एकूण खरेदीचे क्षेत्र | पैकी **१-३३-००** |

सबब सदर जमीन मिळकतीवर किंवा सदर मिळकतीच्या कोणत्याही भागावर कोणाचेही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, तारण, भाडेपट्टा, साठेखत, अखत्यारपत्र, एम.ओ.यू. किंवा तत्सम कोणतेही दावे मालकी व अन्य हक्क, हितसंबंध असलेल्या व्यक्तींनी किंवा संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन २१ दिवसांच्या आत आपल्या हक्क हितसंबंधांचे स्वरूप विषद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्त्यावर लेखी कळवावे अगर समक्ष येऊन भेटावे. वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, व बोजारहित असुन त्यावर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजुन माझे अशिल सदर मिळकतीच्या व्यवहाराचे पुढील काम पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही तक्रारी, दावे, हरकती रद्दबातल आहेत किंवा त्या सोडून दिलेल्या आहेत असे गृहीत धरले जाईल याची तमाम जनतेने नोंद घ्यावी.

**सही/-**
**वकील श्री. किशोर कान्हा पाटील**

कार्यालयीन पत्ता : गाळा क्रमांक १०९, पहिला मजला, नगरपालिका शॉपिंग कॉम्प्लेक्स, ओल्ड पनवेल, तालुका पनवेल, जिल्हा रायगड ४१०२०६. संपर्क – ९६१९११२१५५



### CHANGE OF NAME

I the undersigned **Sahil Nilkhanth Koli** (Old name) residing At **Mora Koliwada, Tal. Uran, Dist. Raigad.**

I Changed my Name by the **Affidavit No. 2152041721268600124198** dated **17 January 2022.** So that I remitter issue may here after be called by new Name **Sahil Nilkant Koli**

Sign. by New Name

**Sahil Nilkant Koli**

**Add : Mora Koliwada, Tal. Uran, Dist. Raigad.**



पनवेल भाजपतर्फे

जनहितार्थ

माहितीसाठी




**पनवेल महानगरपालिका हद्दीत मंगळवार, दि. १८ जानेवारी २०२२ रोजी होणारे**

**कोरोना प्रतिबंधक लसीकरण**

**(सर्व केंद्रांवर ऑनलाइन व ऑफलाइन लसीकरण होईल)**

**कोविशिल्ड**

**सर्व केंद्रांवर पहिला व दुसरा डोस (वयोगट :** १८ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

- १. यूपीएचसी-१, गावदेवी पाडा, पनवेल
- २. नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र-२, कोळेश्वर शाळा, कोळीवाडा, पनवेल
- ३. आयटीएम कॉलेज, नवीन पनवेल
- ४. सिडको समाज मंदिर, से. ५ ई (ना.पा.आ.के.४, कळंबोली)
- ५. यूपीएचसी-५, डी-मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर
- ६. यूपीएचसी-६, सुषमा पाटील विद्यालय, कामोठे
- ७. आरोग्य उपकेंद्र, कर्नाटक समाज हॉलजवळ, नवीन पनवेल, से.२
- ८. ज्ञानसाधना केंद्र, सेक्टर ६, कामोठे
- ९. नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ पब्लिक हेल्थ ट्रेनिंग ॲण्ड रिसर्च सेंटर, से. १८, खांदा कॉलनी
- १०. टाटा ॲडव्हान्स सेंटर, खारघर
- ११. आरोग्य उपकेंद्र १, रोटरी कम्युनिटी सेंटर, सेंट जॉर्ज चर्चजवळ, नवीन पनवेल
- १२. सेंट्रल रेल्वे, पनवेल
- १३. काळण समाज हॉल, पनवेल
- १४. आरोग्य उपकेंद्र, नावडे, कळंबोली (उपप्रभाग समिती कार्यालय, नावडे, जुना पुणे-मुंबई हायवे)
- १५. डॉ. आंबेडकर भवन, पनवेल
- १६. न्यू इंग्लिश स्कूल, कळंबोली
- १७. आरोग्य उपकेंद्र काळभैरव मंगल कार्यालय, प्रभाग समिती ब कार्यालयाच्या बाजूला, कळंबोली

**१५ ते १८ वयोगटाचे लसीकरण**

- सी. के. ठाकूर मराठी आणि इंग्रजी माध्यमिक विद्यालय (५००)
- बार्न्स स्कूल पनवेल (३९८)
- न्यू होरायझन स्कूल, खांदा कॉलनी (३५०)
- दयानंद अँग्लोवेदीक शाळा, नवीन पनवेल (४१०)
- न्यु इंग्लिश स्कुल, कळंबोली (५००)
- सिद्धार्थ मल्टिपरपज रेसिडेन्सियल हायस्कूल से- १९, खारघर (१९१)
- एम्पीरीयन स्कूल से- ३५ जी खारघर (५०)
- एलिट पब्लिक स्कूल तळोजा (३००)
- जनार्दन भगत शिक्षण प्रसारक मंडळ न्यु इंग्लिश स्कुल ओवे-पेठ (६०)
- रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालय (३१५)
- सिद्धार्थ मल्टिपरपज रेसिडेन्सियल हायस्कूल से- १९, खारघर (१९१)
- एम्पीरीयन स्कूल से- ३५ जी खारघर (१९१)
- के पी सी स्कूल खारघर (२५०)

सहा नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांवर (यूपीएचसी) परदेशी जाणाऱ्या नागरिकांसाठी दुसरा डोस उपलब्ध असेल.

**निवडक**

## वावंजेत लोखंडी प्लेटची चोरी

**पनवेल :** एका बिल्डींगच्या स्लॅबकरिता आणलेल्या लोखंडी सेट्रींग प्लेटची (किंमत जवळपास १ लाख ६० हजार रुपये) अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याने याबाबतची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. नाना शंकर पाटील या ठेकेदारांनी दिलेल्या तक्रारीनुसार त्यांनी वावंजे गाव येथील साई कुटीर बिल्डींग नं.०२, गाळा नं.१ या ठिकाणी बिल्डींग स्लॅबकरिता लागणारी लोखंडी सेट्रींगच्या ८० प्लेट ठेवली होती. अज्ञात चोरट्याने शटरचे कुलूप तोडून गाळ्यात प्रवेश करून तो माल चोरून नेला आहे. याबाबतची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## व्हॅक्सिनेशन ऑन व्हील्स कार्यक्रम



**पनवेल :** पनवेलच्या ग्रामीण भागामध्ये नोव्हेंबर २०२१मध्ये व्हॅक्सिनेशन ऑन व्हील्स हा कार्यक्रम सुरू झाला. सिप्ला द्वारे हे आयोजित करण्यात येत आहे. रायगड जिल्हा परिषदेच्या बेलवली येथील प्राथमिक शाळेत हे शिबिर घेण्यात आले. गेल्या तीन महिन्यांत सात हजार लोकांना लसीकरण करण्यात आले आहे. या वेळी तहसीलदार विजय तळेकर, सिप्लाच्या उल्का धुरी आदी उपस्थित होते.

## नवी मुंबईत रक्तदान शिबिर

**नवी मुंबई :** श्री संत सावता माळी मंडळाच्या वतीने संस्थापक कै. गोविंद भास्कर यांच्या स्मृती प्रित्यर्थ रविवारी (दि. १६) श्री संत सावता माळी भवन येथे रक्तदान व नेत्र चिकित्सा



शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. कोरोनाच्या काळात राज्यात रक्ताचा तुटवडा जाणवू नये याकरिता रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आल्याचे मंडळाचे कार्याध्यक्ष हरीशचंद्र भूजबळ व उपाध्यक्ष कृष्णा तांबे यांनी सांगितले. या वेळी इंदूमती ठाकूर, प्रभावती उमाळे, बबनराव जगझाप, हेमलता ठाकूर व अन्य पदाधिकारी उपस्थित होते. सुमारे ७० रक्तदात्यांनी रक्तदान केले. ठाणे येथील वामनराव ओक रकतपेढीच्या वतीने रक्त संकलित करण्यात आले.

## उरणमधून एसटी फेऱ्यांना सुरुवात

**उरण :** तालुक्यातील प्रवाशांच्या सेवेसाठी उरण एसटी आगारातून सोमवार (दि. १७)पासून नियमितपणे बसेसच्या फेऱ्या सुरू झाल्या आहेत. आता उरणमधील प्रवाशांना वाशी, नवी मुंबई, पनवेल, पेण दादर आदी ठिकाणी शासकीय बसने प्रवास करता येणार आहे. एसटी सुरू झाल्याने प्रवाशी वर्गांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

# कळंबोलीतील समस्यांबाबत अधिकाऱ्यांना सूचना

### प्रभाग समिती ‘ब’ची नगरसेवकांच्या उपस्थितीत बैठक; विविध विषयांवर चर्चा

**कळंबोली : रामप्रहर वृत्त**

कळंबोली येथील प्रभाग समिती ब च्या कार्यालयात सोमवारी (दि. १७) प्रभाग समिती ’ब’ची बैठक घेण्यात आली. या बैठकीला प्रभात समितीतील सर्व अधिकाऱ्यांना प्रभागातील समस्या सोडविण्याबाबत नगरसेवकांनी सूचना केल्या. या बैठकीला प्रामुख्याने तीन विषयावर चर्चा करण्यात आली. स्वच्छता, अतिक्रमण व कोरोनाचा वाढता प्रभाव पाहता निर्बंधांबाबत सविस्तर चर्चा या वेळी करण्यात आली.



प्रभागातील स्वच्छतेविषयी अधिकाऱ्यांना सूचना देण्यात आल्या. यामध्ये रस्ते, फूटपाथ, गटार, बस स्थानक, उद्याने, मैदाने, मोकळे भूखंड येथील स्वच्छता प्रभागातील अधिकाऱ्यांनी करवून घेणे. शहरातील अतिक्रमणाबाबतही अधिकाऱ्यांना सूचना देण्यात आल्या. यामध्ये बेकायदेशीररित्या उभारलेल्या टपऱ्या, टपरीधारक, फूटपाथवरील अवैध धंदे म्हणजेच असे अतिक्रमण ज्यामुळे नागरिकांना त्रास होतो ते तत्काळ हटवावे. प्रभागात अडचण ठरणारे अतिक्रमणावर कारवाई करण्यात यावी, असे सांगण्यात आले. यासोबतच वाढती कोरोना रुग्णसंख्या व कोरोनाचा नवा व्हेरिएंट ओमायक्रॉनला नियंत्रणात ठेवण्यासाठी शासनाकडून निर्बंध जाहीर करण्यात आले आहेत. या नियमांचे तंतोतंत पालन होते आहे की नाही हे पाहण्याची जबाबदारी अधिकाऱ्यांची आहे. यामध्ये उशीरापर्यंत सुरू असणारी आस्थापने, सार्वजनिक ठिकाणी मास्कचा वापर, सोशल डिस्टन्सिंगचे पालन करणे गरजेचे असून यासंदर्भात नागरिकांना आवाहन करणे, अशा विविध सूचना अधिकाऱ्यांना करण्यात आल्या.

या वेळी प्रभाग समिती सभापती प्रमिला पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या ही बैठकीला नगरसेवक अमर पाटील, बबन मुकादम, नगरसेविका मोनिका महानवर, विद्या गायकवाड, कमल कोठारी, भाजप कळंबोली मंडल अध्यक्ष रविनाथ पाटील, पनवेल महापालिका प्रभाग अधिकारी उपस्थित होते.

## ओमायक्रॉनच्या पार्श्वभूमीवर नियमांचे पालन करा; अन्यथा कारवाई



**पनवेल : वार्ताहर**

वाढत्या ओमायक्रॉनच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी शासनाने दिलेल्या आदेश व नियमांचे काटेकोरपणे पालन करावे; अन्यथा कारवाईचा बडगा उगारावा लागेल, असे पनवेल तालुका पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक रवींद्र दौंडकर यांनी म्हटले आहे.

ओमायक्रॉनशी दोन हात करण्यासाठी पनवेल तालुका पोलिसांनी त्यांच्या हद्दीमध्ये धडक मोहीम राबविण्यात येत आहे. कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध वरिष्ठ पोलीस निरीक्षक रवींद्र दौंडकर यांनी कारवाई सुरूवात केली आहे.

पनवेल तालुका पोलीस हद्दीमध्ये पोलिसांची विविध पथके स्थापन केली आहेत. त्यानुसार रात्री उशिरापर्यंत हॉटेल व्यवस्थापन, पान टपऱ्या, चायनिज गाड्या आदी हॉटेल्स वर कारवाई करण्यात आली आहे. तसेच मास्क न घालणे, जास्त गर्दीचे लोक जमविणे, क्रिकेट सामने भरविणे यांच्याविरोधातही भा. दं. वी. कलम १८८ अन्वये कारवाई केली आहे.



## संपूर्ण नाव : नारायण ज्ञानदेव पाटील उर्फ एन.डी.

**जन्म :** १५ जुलै १९२९ – ढवळी (नागाव), जि. सांगली येथे अशिक्षित शेतकरी कुटुंबात जन्म

**शिक्षण :** एम. ए. (अर्थशास्त्र), पुणे विद्यापीठ, १९५५; एल.एल.बी. (१९६२ ) पुणे विद्यापीठ

### अध्यापन कार्य

१९५४–१९५७ छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा येथे प्राध्यापक तसेच ‘कमवा व शिका’ या योजनेचे प्रमुख व रेक्टर

१९६० साली कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, इस्लामपूर येथे प्राचार्य

### शैक्षणिक क्षेत्रातील कार्य

शिवाजी विद्यापीठ – पहिल्या सल्लागार समितीचे सदस्य १९६२

शिवाजी विद्यापीठ – सिनेट सदस्य १९६५

शिवाजी विद्यापीठ – कार्यकारिणी सदस्य १९६२–१९७८

शिवाजी विद्यापीठ – सामाजिकशास्त्र विभागाचे डीन १९७६–१९७८

सदस्य, प्राथमिक शिक्षण आयोग, महाराष्ट्र राज्य १९९१

रयत शिक्षण संथेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य – १९५९पासून

रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन – १९९०पासून

दक्षिण महाराष्ट्र शिक्षण प्रसारक मंडळ, बेळगाव अध्यक्ष – १९८५पासून

### राजकीय कार्य

१९४८ – शेतकरी कामगार पक्षात प्रवेश

१९५७ – मुंबई गिरणी कामगार संघटनेचे सरचिटणीस

१९६० – ६६, १९७०–७६, १९७६–८२ अशी १८ वर्षे महाराष्ट्र विधान परिषदेचे सदस्य

१९६९ – १९७८, १९८५ – २०१० – शे.का.प.चे सरचिटणीस

१९७८ – १९८० – सहकारमंत्री, महाराष्ट्र राज्य

१९८५ – १९९० – महाराष्ट्र विधानसभा सदस्य (कोल्हापूर मतदारसंघाचे प्रतिनिधी)

१९९९ – २००२ – निमंत्रक लोकशाही आघाडी सरकार महाराष्ट्र राज्य सीमाप्रश्न समितीचे सदस्य व सीमा चळवळीचे प्रमुख नेते

### मिळालेले सन्मान/पुरस्कार

✻ भाई माधवराव बागल पुरस्कार – १९९४ ✻ स्वामी रामानंदतीर्थ विद्यापीठ, नांदेड – डी.लीट.पदवी, १९९९ ✻ राष्ट्रीय बियाणे महामंडळ (अध्यक्षपद) भारत सरकार – १९९८ – २००० ✻ डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ – डी.लीट.पदवी, २००० ✻ विचारवेध संमेलन, परभणी अध्यक्षपद – २००१ ✻ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर – डी.लीट.पदवी ✻ शाहीर पुंडलिक फरांदे पुरस्कार **✻ जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेतर्फे जनार्दन भगत यांच्या जयंती सोहळ्यानिमित्त देण्यात येणारा स्व. जनार्दन भगत स्मृती जीवन गौरव पुरस्कार (२९ फेब्रुवारी २०२०)**





### भूषविलेली पदे

रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य

समाजवादी प्रबोधिनी, इचलकरंजी – उपाध्यक्ष

अंधश्रद्धा निमूर्लन समिती, महाराष्ट्र – अध्यक्ष

डॉ. बाबासाहेब आंबेडकर अकादमी, सातारा – अध्यक्ष

जागतिकीकरण विरोधी कृती समिती – मुख्य निमंत्रक

महात्मा फुले शिक्षण संस्था, इस्लामपूर – अध्यक्ष

दक्षिण महाराष्ट्र शिक्षण प्रसारक संस्था, बेळगाव – अध्यक्ष

महाराष्ट्र राज्य सीमा प्रश्न समिती – सदस्य



**डॉ. बाबासाहेब आंबेडकर अकादमी, समाजवादी प्रबोधिनी, अंधश्रद्धा निर्मुलन समिती या संस्थांच्या सहकार्याने विद्यार्थी, शिक्षक –प्राध्यापक प्रबोधन कार्याला चालना.**

### प्रसिद्ध झालेले लेखन

समाजविकास योजनेचे वस्त्रहरण (पुस्तिका)

शेतजमिनीवरील कमाल मर्यादा आणि महाराष्ट्र सरकारचा प्रतिगामी कायदा (पुस्तिका) १९६२

काँग्रेस सरकार आणि शेतकऱ्यांची लूट (पुस्तिका) १९६२

शेतीमालाला किफायतशीर किमतीची हमी आणि घाऊक व्यापाराचे राष्ट्रीयीकरण (पुस्तिका) १९६३

वाढती महागाई आणि ग्राहकांची ससेहोलपट (पुस्तिका) १९६६

महाराष्ट्र सरकारच्या श्वेतपत्रिकेचे (व्हाईट पेपर) कृष्णस्वरूप (पुस्तिका) १९६७

शेतीमालाच्या किफायतशीर किमतीची कैफियत (पुस्तक) १९७०

शेवटी हे शिक्षण आहे तरी कोणासाठी? (पुस्तिका) १९९२

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे (पुस्तिका)

नववे विचारवेध संमेलन परभणी, अध्यक्षीय भाषण, २००१ (नवसाम्राज्यवादी युगातील भारतीय लोकशाही समोरील आव्हाने)

### रयत शिक्षण संस्थेतील विशेष कार्य

**चेअरमन पद काळात :** औद्योगिक प्रशिक्षण संस्था, आश्रमशाळा, साखरशाळा, नापासांची शाळा, श्रमिक विद्यापीठ, संगणक शिक्षक केंद्र, कर्मवीर भाऊराव पाटील इन्फर्मेशन ॲण्ड टेक्नोलॉजी इन्स्टिट्यूट, ‘कमवा व शिका’ या योजनेवर भर, स्पर्धा परीक्षा केंद्रे, गुरुकुल प्रकल्प, लक्ष्मीबाई पाटील शिष्यवृत्ती योजना, सावित्रीबाई फुले दत्तक–पालक योजना यांची राबणूक, दुर्बल शाखा विकास निधी, म.वि.रा.शिंदे अध्यासन केंद्रे आदींची स्थापना, कर्मवीर विद्याप्रबोधिनीमार्फत विविध पुस्तकांची निर्मिती.

## गव्हाण विद्यालयात प्रा. एन. डी. पाटील यांना आदरांजली

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेचे माजी चेअरमन व कर्मवीर भाऊराव पाटील यांचे मानसपुत्र, माजी सहकार मंत्री, शेतकरी कामगार पक्षाचे ज्येष्ठ नेते श्रमिक कष्टकरी कामगारांचा बुलंद आवाज प्राध्यापक डॉ. एन. डी. पाटील यांचे सोमवारी (दि. १७) निधन झाले. रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री. छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये प्रा. एन. डी. पाटील यांच्याप्रती व्यथित अंतःकरणाने भावपूर्ण संवेदना प्रकट करण्यात आल्या.

या वेळी विद्यालयाच्या प्राचार्या साधना डोईफोडे, उपमुख्याध्यापक जगन्नाथराव जाधव, रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर व समन्वय समिती सदस्य प्रमोद कोळी आणि रवींद्र भोईर तसेच इतर सेवक उपस्थित होते.



## स्वाभिमानी युथ रिपब्लिकन पक्षातर्फे प्रा. एन. डी. पाटील यांना श्रद्धांजली

**पनवेल : वार्ताहर**

शेकापचे ज्येष्ठ नेते एन. डी. पाटील यांच्या निधनाबद्दल पनवेल येथे स्वाभिमानी युथ रिपब्लिकन पक्षाच्या वतीने जिल्हाध्यक्ष महेश साळुंखे व त्यांच्या सहकाऱ्यांनी भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

शेकापचे ज्येष्ठ नेते एन. डी. पाटील तसेच राष्ट्रीय सरचिटणीस २०१० सालापर्यंत ते होते. १९४८ साली त्यांनी शेकापची डावी विचारसरणी स्विकारली व ते अखेरपर्यंत त्यांनी त्याचे पालन केले. रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलचे ते सदस्य होते. त्यांनी मुंबईतील गिरणी कामगार संघटनेचे नेतृत्व केले होते. रायगड जिल्ह्यातील प्रत्येक शेतकरी आंदोलनाचे त्यांनी नेतृत्व केलेले आहे. जिल्ह्यातील एसीझेडविरूद्ध त्यांनी तीव्र आंदोलन छेडले होते व त्यात त्यांना यश मिळाले होते यामुळे शेतकऱ्यांनासुद्धा मोठा फायदा झाला. पुलोद सरकारमध्ये ते सहकार मंत्री होते. त्यावेळी त्यांनी कापूस एकाधिकार योजनेची पुनर्जीवन केले. प्रा. एन. डी. पाटील हे प्रत्येक लोकसभा व विधानसभा निवडणुकीत शेकापचा प्रचार करण्यासाठी पनवेल व रायगडमध्ये आवर्जून येत असत व आपल्या आक्रमक भाषण शैलीने विरोधकांना घाम फोडत असत. तसेच ते रस्त्यावर उतरून आंदोलन करणारे नेते होते. आजही महाराष्ट्राला अनेक आंदोलने त्यांची आठवणीत आहेत व त्यांना पक्षाच्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली वाहत असल्याचे जिल्हाध्यक्ष महेश साळुंखे यांनी सांगितले आहे.

# पनवेलच्या कच्छी मोहल्ल्यात नवीन रस्त्याच्या कामाला सुरुवात



### नगरसेवक मुकीद काझी यांचा पाठपुरावा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेचे नगरसेवक मुकीद काझी यांच्या प्रयत्न व पाठपुराव्यामुळे प्रभाग क्रमांक १४ येथे नवीन रस्त्याच्या कामाला सोमवारी (दि. १७) सुरुवात झाली.

पनवेलमधील प्रभाग क्रमांक १४ येथील बंदर रोड, पाटकर वाडा नितीन मिश्रा ते आदिल टॉवर कच्छी मोहल्ला येथील रस्ता अत्यंत दयनीय झाला होता. रस्त्याची अवस्था इतकी वाईट झाली होती की, आजूबाजूला राहणाऱ्या लोकांना त्यांच्या घरी जाण्यासाठी दररोज अडचणींचा सामना करावा लागत होता. नागरिकांना होणाऱ्या अडचणींची दखल घेत नगरसेवक मुकीद काझी यांनी महापालिकेकडे पाठपुरावा केला. त्याअनुषंगाने सोमवारी पहाटे या ठिकाणी नवीन रस्ता तयार करण्याच्या कामाला सुरुवात झाली.

या वेळी भाजप अल्पसंख्याक युवा मोर्चाचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष जवाद मुकीत काझी, शहर अध्यक्ष निसार सय्यद, उबेदुल्ला पटेल, तौफिक खांडे, शोएब शेख, गणी पटेल, मकसूद शेख आदी उपस्थित होते.

## संपादकीय


# लढवय्ये नेतृत्व निमाले

ज्यांनी-ज्यांनी प्राध्यापक एन. डी. पाटील यांची प्रदीर्घ सामाजिक-राजकीय वाटचाल जवळून पाहिली आहे, त्या प्रत्येकाजवळ त्यांच्या लढवय्या नेतृत्वाचे अनेक किस्से असतील. सामाजिक जीवनातील आपली अवघी वाटचाल त्यांनी कायमच झुंजार, संघर्षशील, परखड आणि तपस्वी वृत्तीने केली. अभ्यासू वृत्तीने पुरोगामी विचारांची कास धरून त्यांनी अखंड सर्वसामान्यांच्या, दीनदुबळ्यांच्या प्रश्नांचे, आंदोलनांचे नेतृत्व केले. सर्वसामान्यांविषयीची त्यांची कणव, पोटतिडीक प्रामाणिक होती.

**जानेवारी महिनाच होता तो, २०१४ सालातला. कोल्हापुरातील टोलविरोधी आंदोलनाचे नेतृत्व प्रा. एन. डी. पाटील सरांकडे आले होते. आंदोलनाला दाद न देता टोल आकारणी सुरूच ठेवण्याची आडमुठी भूमिका तत्कालीन राज्य सरकारने घेतली होती. अशा परिस्थितीत आपल्या वयाची, तब्येतीची पर्वा न करता एन. डी. पाटील यांनी बेमुदत उपोषणाची घोषणा केली. सरांनी उपोषण मागे घ्यावे यासाठी अनेकांनी प्रयत्न केले, परंतु सर भूमिकेवर ठाम राहिले. निर्णय मागे घेणे त्यांच्या स्वभावात नव्हते. अवघे आयुष्य सर्वसामान्यांच्या प्रश्नांशी निगडित आंदोलनांकरिता वेचणार्‍या एन. डी. पाटील यांचे उपोषण मंत्रालयातील राज्यकर्त्यांना खडबडून जागे करून गेले. अखेरीस सायंकाळी दोघा मंत्र्यांनी आंदोलनस्थळी भेट दिली आणि टोल कायमचा हद्दपार करण्याची घोषणा केली, तेव्हा कुठे एन. डी. पाटील यांनी आपले उपोषण मागे घेतले. एन. डी. अर्थात नारायण ज्ञानदेव पाटील स्वत: सर्वसामान्य पार्श्वभूमीतून पुढे आले होते. त्यांचा जन्म १५ जुलै १९२९चा, सांगली जिल्ह्यातील ढवळी नागाव येथील एका शेतकरी कुटुंबातला. परंतु त्या काळी त्यांनी पुणे विद्यापीठातून अर्थशास्त्र विषयात एमएची पदवी घेतली आणि पुढे एलएलबीचे शिक्षणही संपादन केले. पुढे काही काळ ते सातार्‍यातील छत्रपती शिवाजी कॉलेजमध्ये प्राध्यापक म्हणून कार्यरत होते. अनेक गोरगरीब विद्यार्थ्यांच्या जीवनाला आधार आणि आकार देणार्‍या कमवा आणि शिका योजनेचे प्रमुखपद त्या वेळी त्यांच्याकडे होते. १९४८ साली त्यांनी शेतकरी कामगार पक्षात प्रवेश केला आणि पक्षाची विचारसरणी महाराष्ट्राच्या तळागाळापर्यंत नेण्यासाठी अखंड अथक प्रयत्न केले. त्यातूनच त्यांचे आणि रायगड जिल्ह्याचे ऋणानुबंध जुळले. पुढे अनेक वर्षे ते रायगड जिल्ह्यातील प्रश्नांमध्ये येथील सामान्य जनतेच्या पाठीशी उभे राहिले. रायगड जिल्ह्यातील शेतकर्‍यांच्या सेझविरोधी लढ्यालाही एन. डी. पाटील यांच्या नेतृत्वाने बळ दिले. कालांतराने मुंबईतील गिरणी कामगार चळवळीशीही त्यांचा संबंध आला. त्यांची राजकीय कारकीर्द मात्र सार्‍यांच्याच कायम लक्षात राहणार आहे ती त्यांच्या अभ्यासपूर्ण भाषणांमुळे. १९६० सालापासून सुमारे १८ वर्षे ते राज्य विधान परिषदेचे सदस्य होते. याच दरम्यान १९७८ ते ८० या कालावधीत सहकारमंत्री म्हणूनही त्यांनी काम पाहिले. या काळातील गाजलेली कापूस एकाधिकार योजना त्यांचीच. पुढे १९८५ मध्ये ते कोल्हापूर मतदारसंघातून विधानसभेवरही निवडून गेले. पण त्यांचा पिंड राहिला तो रस्त्यावरच्या आंदोलनाच्या नेतृत्वाचाच. राजकीय क्षेत्रात कार्यरत असूनही त्यांच्या कमालीच्या साधेपणाचे अनेक किस्से सांगितले जातात. डॉ. नरेंद्र दाभोळकर यांनी स्थापन केलेल्या महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या अध्यक्षपदी प्रा. एन. डी. पाटील यांची २०१९ मध्ये निवड करण्यात आली. २०२२ पर्यंत हे पद त्यांच्याकडे राहणार होते. अखेरपर्यंत नैतिकता जपणारे एन. डी. राजकीय-सामाजिक क्षेत्रात येणार्‍या कितीएक पिढ्यांकरिता आदर्शवत राहतील.**

# रस्त्यावरची लढाई लढणारा शेवटचा मालुसरा...

**मधुकर भावे**



१९२९-२०२२

एन. डी. गेले. महाराष्ट्राच्या लढाऊ परंपरेतील शेवटचा मालुसरा धारातीर्थी पडला. गणपतराव देशमुख यांच्या पाठोपाठ एन. डी. यांनी जाणे म्हणजे अन्याय-अत्याचाराविरोधातील रस्त्यावरची लढाई लढणार्‍या सेनापतीनेच जाणे आहे. एन. डी. यांच्या निधनानंतर सामान्य माणसांचा आवाज बुलंद करून रस्त्यावर उतरण्याची हिंमत दाखवणारा आता कोणीही राहीला नाही. तिकडे विदर्भातील जाबुवंतराव असेच अचानक गेले, मृणालताईही अचानक गेली. एन. डी. जाता जाताही यमराजाशी आपला लढा झुंजत राहीले होते. एन. डी. गेल्याची बातमी कानावर आपटली आणि क्वारंटाईनची बंधणे तोडून एन. डी. यांच्या पार्थिवाच्या पायाला हात लावण्याची तीव्र इच्छा मनात होती. एन. डी. हे असे योद्धे होते की, जो रस्त्यावरची सामान्य माणसाची लढाई लढतच राहिला. पण त्याचवेळी वैचारिक आघाडीवर भल्या-भल्या बुद्धीवंतांची किंवा विधानसभेतील वैधानिक आघाडीवर भल्या-भल्या मंत्र्यांची फटफजीती करण्याची वैचारिक ताकद एन. डी. यांच्या विचारांत होती. अभ्यासात, वागण्यात आणि चारित्र्यातही होती. त्यामुळेच शरद पवार यांचे सख्खे मेहुणे असतानाही वैचारिक भूमिकेशी एन. डी. यांनी आयुष्यभर कधीच तडजोड केली नाही. जिथे लढा आहे तिथे एन. डी. आहेत. मग तो बेळगाव-कारवारचा सीमा लढा असो, महागाईविरोधातील लढा असो, संयुक्त महाराष्ट्राचा लढा असो, सेझ विरोधातील रायगडच्या शेतकर्‍याचा लढा असो नाहीतर कोल्हापूरच्या टोलनाक्याचा लढा असो... लढा कोणताही असो आणि समोर कोणीही नेता असो त्या नेत्याची, जाती-पातीची नात्यागोत्याची किंवा सत्तेची पर्वा एन. डी. यांनी कधीच केली नाही. छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात येसाजी कंक, तानाजी मालुसरे, बाजी प्रभू, हंबीरराव मोहिती किंवा अलोजीबाबा कसे भरधार छातीचे होते... आणि वैचारिकदृष्ट्या एका विचारावर ठाम होते. धन्याशी इमान राखणारे होते. एन. डी. यांच्याकडे पाहिल्यानंतर दोन हातात दोन दानपट्टे घेवून लढणारे ते नरवीर कसे असतील, याचा अंदाज बांधता येउ शकतो. भक्कम वैचारिक भूमिकेचा, भरदार-पीळदार शरीरयष्टीचा,... माईक असो किंवा नसो.... हजार-पाच हजार लोकांपर्यंत माईकशिवाय खणखणीतपणे आपला शब्दन् शब्द काळजाच्या ठाक्यापर्यंत ज्या नेत्याचा पोहोचू शकत होतो त्याचे नाव एन. डी. पाटील होते.

६० वर्षांच्या पत्रकारितेतील दोन हातात दोन दानपट्टे घेवून लढणारी एन. डी. यांची अनेक रूपे आज डोळ्यांसमोरून तरळत आहेत. तो इस्लामपूरचा गोळीबार... ओडीसाच्या गोळीबारात चार तरुण मृत्युमुखी पडलेले... त्यामध्ये एन. डी. यांचा सख्खा पुतण्या... गणपतराव सांगत होते... 'मोर्चा थांबवूया'... एन. डी. सांगत होते.. ' नाही... बिलकूल नाही... मोर्चा थांबणार नाही..' आणि हजारोंचा मोर्चा पुतण्याच्या प्रेताला आडवे जावून कचेरीवर धडकतो...

वैरागचा मोर्चा... त्या मोर्चावरही गोळीबार झाला. एन. डी. ताठ मानेने तासभर बोलत उभे राहीले. रायगडच्या सेझच्या शेतकर्‍यांचा लढा मुकेश अंबानी यांनी सगळी ताकद पणाला लावून लढा चिरडून काढण्याकरिता सगळे उपाय वापरले.. शांततामय मार्गाने हजारो शेतकर्‍यांना नागोठणे-वडखळ रस्त्यावर उतरवून एन. डी. यांनी 'सेझ' चा लढा कसा लढवला आणि अंबानी यांनी पळता भुई थोडी केली. काय होता सेझ चा लढा? 'अ' शेतकर्‍याने दोन एकर जमीन सेझसाठी विकली तर त्याच्या राहीलेल्या दहा एकर जमिनीला काटेरी कुंपन ठोकून सगळे शेत हडपण्याचा कार्यक्रम सुरू होता... त्यावेळी पश्चिम महाराष्ट्रातील एन. डी. पाटील रायगडच्या रस्त्यावर उतरले. एन. डी. यांनी प्राणपणाने जे जे लढे लढवले आहेत ते ते लढे त्यांनी जिंकलेले आहेत एवढेच नव्हे तर सेझ च्या लढ्यात रायगडमधील शेतकर्‍याला एन. डी. यांनी सन्मानाने उभे केले.

एन. डी. विधानसभेत लढले... रस्त्यावर लढले... एकदा त्यावेळचे मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण त्यांना म्हणाले होते की, ' तुम्ही कितीही जोरात बोललात तरी बहुमत आमच्या मागे आहे.' एन. डी. ताडकन् म्हणाले... 'होय... मुख्यमंत्रीसाहेब, बहुमत तुमच्यामागे आहे हे मला मान्य आहे म्हणून तर तुम्ही सत्तेवर आहात. लोकशाहीचा खेळ एकावन्न विरुद्ध एकोणपन्नास असाच असतो. त्या खेळात तुमच्यासोबत एकावन्न आहेत. पण आम्ही रस्त्यावर जेव्हा लढाई लढायला उतरतो तेव्हा आमच्यासोबत एकावन्न असतात, हे लक्षात ठेवा... डोकी मोजून सत्ता मिळत असली तरी रस्त्यावरच्या लढाईत आमचेच बहुमत आहे. आम्हाला सत्तेची पर्वा नाही...' आणि एन. डी. यांना सत्तेची पर्वा कधीच नव्हती. १९७८ साली पुलोद च्या सरकारात शरद पवार यांच्या मंत्रीमंडळात ते सहकार मंत्री होते. फेब्रुवारी १९७९ मध्ये राष्ट्रपती राजवट लावून इंदिरा गांधी यांनी शरद पवार यांचे सरकार बरखास्त केले. सरकार बरखास्त झाल्याची बातमी आल्याबरोबर शरद पवार ऑस्ट्रेलियाविरोधातील सामना बघायला वानखेडे स्डेडीअमवर गेले. आणि एन. डी. पाटील मुंबई-कोल्हापूर लाल डब्याच्या एस. टी. ने रात्रभर प्रवास करून कोल्हापूरला गेले. रयत शिक्षण संस्थेच्या कार्याध्यक्षपदाचा काळ सोडला तर एन. डी. यांनी सगळा महाराष्ट्र एस. टी. मध्ये बसूनच पिंजून काढला आहे. संपूर्ण महाराष्ट्र पायाखाली घातलेला एन.डी. यांच्यासारखा नेता दुसरा कोणी नाही.. सामान्य माणसांच्या बांधिलकीचे राजकारण आता कायमचे संपले. गणपतराव देशमुखा आणि एन. डी. यांच्यासोबतच ते निघून गेले. संप तोडून काढणारे आता सत्तेवर बसले आणि एस. टी. ने फिरणारे एन. डी. आता राहीले नाहीत. तो लढावू महाराष्ट्र आता संपलेला आहे. शेवटचा लढवय्या म्हणून एन. डी. यांचेच नाव घ्यावे लागेल. गरीब माणसांच्या प्रश्नांशी महाराष्ट्रात आता कोणालाही काही पडलेले नाही. मुंबईचा गिरणी कामगार प्रचंड उभ्या असलेल्या मॉलच्या इमारतींखाली चिरडला गेला. शेतकर्‍यांचा वाली असलेला शेवटचा मालुसरा एन. डी. यांच्या रूपाने आता अस्थंगत पावला आहे.

एन. डी. यांच्या प्रमाणेच आयुष्यभर त्यांना साथ देणार्‍या त्यांच्या धर्मपत्नी माई ही तेवढीच लढाऊ स्त्री आहे. एन. डी. यांना शेवटपर्यंत त्यांनी साथ दिली. माहेरची ओढ त्यांना कधी वाटली नाही. पेटलेला पदर आणि न विझलेला निखारा घेवून माई आयुष्यभर एन. डी. यांच्या पाठिमागे चालत राहीली. माई तू धन्य आहेस. एन. डी. यांची पत्नी होणे सोपे नव्हते. एन. डी. होणे सोपे असेल... पण एन. डी. यांच्या पत्नी होणे अवघड होते. ते तुम्ही करून दाखवलेत. एन. डी. नाहीत. त्यांच्या पायावर नमन.. तुम्ही आहात तुमच्याही पायावर नमन. महाराष्ट्राने शेवटचा योद्धा गमावला आहे.

# फणसाड अभयारण्यातील पक्षीसंख्येत वाढ

## ■ भीमपंखी फुलपाखरासह दुर्मिळ अष्टपाद प्राण्यांचेही दर्शन

**मुरूड : प्रतिनिधी**

वनविभाग आणि ग्रीन वर्कस् ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने जानेवारी महिन्यात तीन दिवस मुरूड तालुक्यातील फणसाड अभयारण्यात पक्षीगणना केली. त्यामध्ये अभयारण्यातील पक्षीसंख्येत वाढ दिसून आले. या वेळी अभयारण्यात दुर्मिळ अष्टपाद प्राण्यांही आढळले.




(छाया : संजय करडे)

वन कर्मचारी आणि ग्रीन वर्कस् ट्रस्ट या संस्थेचे कार्यकर्ते यांनी एकत्रितरित्या जानेवारी महिन्यात तीन दिवस फणसाड अभयारण्याचे ५४ चौरस किलोमीटर क्षेत्र पिंजून काढून विविध पक्ष्यांची गणना केली व त्याची माहिती प्रशासनास सादर केली आहे. या अहवालात अभयारण्यातील पक्ष्यांची संख्या वाढती असल्याचे दिसून येत आहे. तसेच येथे विविध वन्यजीव, औषधी वनस्पती आणि दुर्मिळ अष्टपाद प्राणीही आढळून आले.

या तीन दिवसांच्या कालावधीत अभयारण्यात १६२ पक्ष्यांची नोंद करण्यात आली. केंटीश प्लोव्हर, ब्लुइथ्रोट, पड्ड्यफिएल्ड वॉरब्लेर, येल्लोव-ब्रॉवेद, वॉरब्लेर हे पक्षी अभयारण्यात पहिल्यांदाच आढळले. त्याव्यतिरिक्त इंडियन फॉरेस्ट स्कॉर्पिओन, इंडियन व्हीओलेतं टारांटूला, बर्ड ड्रोपंपींग स्पायडर, ग्रीन हुंट्स्मन स्पायडर या दुर्मिळ अष्टपाद प्राण्यांचेही दर्शन झाले.

गुहागरपासून दक्षिणेला दिसणार्‍या भिमपंखी या भारतातील सर्वात मोठ्या फुलपाखराचे दर्शन या दुसर्‍या पक्षीगणनेत झाले. हे फुलपाखरू पक्षीगणनेदरम्यान पाच वेगवेगळ्या ठिकाणी दिसले. शिवाय डार्क पीएर्रोट, थ्री-स्पॉट ग्रास येल्लोव, स्पॉटलेस ग्रास येल्लोव ही दुर्मिळ फुलपाखरेदेखील दिसली.

**ग्रीन वर्कस् ट्रस्टचे सहकारी व अभयारण्यातील कर्मचार्‍यांनी तीन दिवसात फणसाडच्या विविध ठिकाणी जाऊन पक्ष्यांची नोंद घेतली. या गणनेमुळे पक्षांच्या विविध जाती कळतात. त्याची प्रसिद्धी झाल्याने पर्यटक व पक्षीप्रेमी येथे आवर्जून भेट देतात. त्यामुळे महसूलवाढीला मोठा हातभार लागतो.**

**-राजवर्धन भोसले,**
**वनपरिक्षेत्र अधिकारी,**
**फणसाड अभयारण्य, ता. मुरूड**

# मुरूड, माणगाव तालुक्यांत कोरोना रुग्णसंख्येत भर

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड तालुक्यात रविवारी (दि. १६) एका दिवसात १४ नव्या कोरोना रुग्णांची नोंद झाली तर माणगाव तालुक्यात ८३ नवे कोरोनाग्रस्त आढळले.

मुरुड तालुका कोरानामुक्त म्हणून ओळखला जात होता. परंतु गेल्या दोन दिवसांत कोरानाबांधितांमध्ये झपाट्याने वाढ होऊ लागली आहे. सध्या ओमायक्रॉनचे रुग्ण नसले तरी कोरानाचे रुग्ण दिवसेंदिवस वाढत आहेत. रविवारी एका दिवसात १४ नवे कोरोना रुग्ण आढळले.

मुरूड तालुक्यात आतापर्यंत एकूण २०२२ कोरानाबाधीत रुग्ण आढळले असून त्यापैकी १८६८ जणांनी कोरोनावर मात केली आहे. तर १०९ जणांचा मृत्यू झाला. त्यापैकी एकाला अलिबाग येथील सिव्हील हॉस्पिटलमध्ये ठेवण्यात आले आहे. तर ४४ रुग्ण घरीच उपचार घेत आहेत, अशी माहिती मुरुड ग्रामीण रुग्णालयातून देण्यात आली.

नागरिकांनी घराबाहेर पडताना मास्कचा वापर करावा, सोशल डिस्टन्सिंग पाळावे, लसीकरण करून घ्यावे असे आवाहन मुरूड तहसील कार्यालयामार्फत करण्यात आले आहे.

**माणगाव : प्रतिनिधी**

तालुक्यात रविवारी सायंकाळी ५ वाजेपर्यंत ८३ नवे कोरोना पॉझिटिव्ह रुग्ण आढळले. माणगाव तालुक्यात सध्या ४१७ कोरोनाबाधीत रुग्ण असल्याची माहिती आरोग्य विभागाकडून देण्यात आली.

## आरोग्य प्रहर

# कोरफडचा रस प्या आणि वाढवा रोगप्रतिकारक शक्ती

आयुर्वेदात सुपरफूड 'कोरफड'चे बरेच फायदे सांगितले गेले आहेत. शरीराची रोग प्रतिकारशक्ती वाढविणे, पोटाच्या समस्या आणि त्वचेच्या समस्या कमी करण्यात खूप फायदा होतो. यामुळे बरेच लोक रस, भाजी किंवा इतर आणखी प्रकारे कोरफडचे सेवन देखील करतात. मात्र, सध्याच्या वाढलेल्या कोरोना काळात तर कोरफडचा रस पिणे आपल्या आरोग्यासाठी फायदेशीर आहे. दररोज तुम्ही कोरफडचा रस पिलातर कोरोनापासून दूर राहण्यासाठी तुम्हाला मदत होईल.

कोरफडाच्या पानांमध्ये ए, बी१, बी२, बी३, बी६, बी१२, सी, ई आणि फॉलिक ॲसिड यांसारखी पोषक तत्व आढळतात. आरोग्याच्या दृष्टीने कोरफडाची पाने ही नैसर्गिकरित्या प्रभावशाली आयुर्वेदीक वनस्पती आहे. उपासी पोटी कोरफडचा रस पिल्याने रोगप्रतिकारक शक्ती वाढतेच आणि आपले वाढलेले वजन देखील कमी होण्यास मदत होते.

कोरफडचा रस पिण्यासाठी शक्यतो ताजीच कोरफड असणे आवश्यक आहे. कारण ताज्या कोरफडने आपल्याला जास्त फायदा होऊ शकतो. कोरफडचा रस पिण्यासाठी थोडा कडु असला तरी तो आपल्या आरोग्यासाठी अत्यंत फायदेशीर आहे. विशेष म्हणेज कोणत्याही वयोगटातील लोक कोरफडचा रस पिऊ शकतात.

कोरफडचा रस तयार करण्यासाठी सर्वांत अगोदर ताजी कोरफड घ्या. ती स्वच्छा धुवा आणि कापा त्यामधील गर काढा आणि बारीक करू घ्या. त्यामध्ये थोडे पाणी घ्याला आणि तसाच प्या. मात्र, कोरफडचा रस पिल्यानंतर किमान एक ते दोन तास काहीही खाऊ नका.

कोरफडीच्या औषधी गुणांमुळे खरचटल्यास, कापल्यास, भाजल्यास किंवा एखादा किडा चावल्यास प्रथमोपचार म्हणून कोरफडचा वापर केला जातो. जगभरात कोरफडीच्या तब्बल ४००हून अधिक प्रजाती आढळतात. परंतु, त्यापैकी केवळ ५ प्रजाती वापरल्या जातात. कोरफडात असलेल्या गुणांमुळे केस दाट आणि सुंदर होण्यास मदत होते.

-कोरफडचे जास्त वेळा किंवा चुकीच्या पद्धतीने सेवन केल्यास शरीरातील पोटॅशियमची पातळी कमी होते. यामुळे हृदयाचा गतीमध्ये अनियमितता आणि अशक्तपणा या समस्या होऊ शकतात.

-जर, आपण गॅसच्या समस्येस झगडत असाल, तर कोरफडचे सेवन करू नका. यामुळे अडचणी वाढू शकतात. १२ वर्षाखालील मुलांनी कोरफडचे सेवन करणे टाळले पाहिजे.

-जर, आपण कुठलेही औषधे घेत असाल, तर कृपया कोरफड सेवन करण्यापूर्वी एकदा तज्ज्ञांचा सल्ला घ्या. कारण कोरफडमध्ये आढळणारे लॅक्टोस औषधांना शरीरात शोषून घेण्यापासून देखील प्रतिबंधित करतो.

(टीप : कुठल्याही उपचारापूर्वी डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.)

# कर्जतमध्ये ई-श्रमकार्ड शिबिर

**कर्जत : बातमीदार**

शहरातील रोजंदारी कामगारांची नोंदणी करण्यासाठी आरपीआय (आठवले गट), उन्नती फाउंडेशन व कॉमन सर्विस सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने कर्जतमध्ये नुकताच ई श्रमकार्ड शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरात १५९ जणांची नोंदणी करण्यात आली.

कर्जत शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकाजवळ घेण्यात आलेल्या या शिबिराचे उद्घाटन नगरसेवक राहुल डाळिंबकर यांच्या हस्ते करण्यात आले.त्यावेळी आरपीआयचे कोकण नेते मारुती गायकवाड, शहराध्यक्ष अरविंद मोरे, कार्यध्यक्ष सुनील काळे, तालुका कार्याध्यक्ष भगवान जाधव, माजी सचिव किशोर जाधव, मनोज गायकवाड, सुनील सोनावणे, संतोष जाधव, राहुल गायकवाड, माजी नगरसेवक दिपक मोरे, बहुजन विद्यार्थी परिषद जिल्हा अध्यक्ष उत्तम गायकवाड, किशोर गायकवाड, राजू चव्हाण, अलोक डाळिंबकर, मनोज निकम, नाना जाधव, गौतमी उघाडे, संदीप नेत्रगावकर, गणेश भोर्घे, शंकर तलावडे, सुमित गायकवाड, सुदर्शन निकम उपस्थित होते.



(छाया : संतोष पेरणे)

# तांबाटी येथे आरोग्य तपासणी शिबिर



(छाया : विनायक माडपे)

**खोपोली : प्रतिनिधी**

कातकरी उत्थान कार्यक्रमांतर्गत खालापूर तहसील कार्यालय व तांबाटी ग्रुपग्रामपंचायत यांच्या संयुक्त विद्यमाने आणि चौक येथील साई हॉस्पीटलच्या सहकार्याने नुकतच तांबाटी गावातील प्राथमिक शाळेत आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आले. त्याला ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांच्या निर्देशानुसार व प्रांताधिकारी अजित नैराळे यांच्या मार्गर्शनाखाली घेण्यात आलेल्या या आरोग्य तपासणी शिबिराचे उद्घाटन खालापूरचे तहसीलदार आयुष तांबोळी यांनी केले. शिबिरात कोविड प्रतिबंधात्मक उपाययोजनांची अंमलबजावणी करुन ग्रामस्थांची मोफत आरोग्य तपासणी करण्यात आली. तांबाटी ग्रामपंचायतीचे सरपंच अनिल जाधव, उपसरपंच सारिका लाड यांच्यासह ग्रामपंचायत सदस्य, वावोशी मंडळ अधिकारी, तांबाटीचे ग्रामविकास अधिकारी, गोरठण खुर्दचे तलाठी व ग्रामस्थ या वेळी उपस्थित होते.

# रायगड जिल्ह्यातील सहा नगरपंचायतींच्या २१ जागांसाठी आज मतदान

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील सहा नगरपंचायतींच्या २१ जागांसाठी ६० उमेदवार आपले भवितव्य अजमावत आहेत. त्यासाठी सहा नगरपंचायतीमध्ये मंगळवारी (दि. १८) मतदान होणार आहे. १९ तारखेला मतमोजणी होईल.

जिल्ह्यातील सहा नगरपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणूका डिसेंबर महिन्यात पार पडल्या. मात्र ओबीसी आरक्षण रद्द झाल्यामुळे या सहा नगरपंचायतींमधील ओबीसी प्रवर्गासाठी राखीव २१ जागांसाठीची निवडणूक प्रक्रिया स्थगित करण्यात आली होती.

पोलादपूर, म्हसळा, माणगाव, तळा, पाली या पाच नगरपंचायतींमध्ये प्रत्येकी चार तर खालापूर नगरपंचायतीमधील एक अशा या २१ जागा असून या जागांवरच सर्वच राजकीय पक्षांचे भवितव्य अवलंबून आहे.

खालापूर नगरपंचायतीच्या एका जागेसाठी दोन उमेदवार रिंगणात असून तेथे सरळ लढत होत आहे. माणगावच्या चार जागांसाठी १० उमेदवारांमध्ये लढत रंगणार आहे. म्हसळा नगरपंचायतीच्या चार जागांसाठी आठ उमेदवार लढत आहेत. पोलादपूरात चार प्रभागातून १६ उमेदवार आपले भवितव्य अजमावत आहेत. तळा आणि पाली नगरपंचायतीच्या प्रत्येकी चार जागांसाठी १४ उमेदवार निवडणूकीच्या मैदानात उतरले आहेत.



(छाया : शैलेश पालकर)

## पोलादपूरमध्ये यंत्रणा सज्ज; पोलीस बंदोबस्त तैनात

**पोलादपूर : प्रतिनिधी**

येथील नगरपंचायत निवडणुकीवेळी कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी पोलीस आणि प्रशासन सज्ज असून, चार प्रभागातील मतदानावेळी कडक पोलीस बंदोबस्त आणि मतमोजणीवेळी दंगलविरोधी पथक तैनात करण्याचा निर्णय झाल्याची माहिती महाराष्ट्र पोलिसांच्या गुप्तवार्ता विभागातर्फे देण्यात आली आहे.

नगरपंचायतीच्या सदस्य पदाच्या चार जागांसाठी १६ उमेदवार भवितव्य अजमावत आहेत. त्यासाठी आज मतदान घेण्यात येत आहे. मतदानाच्या दिवशी दोन पोलीस अधिकारी, ३५ पोलीसकर्मी व चार वाहतूक पोलीस अशी यंत्रणा सज्ज ठेवली आहे तर निकालावेळी चार पोलीस अधिकारी, ४० पोलीस व एक दंगलविरोधी पथक तैनात ठेवण्यात येणार आहे.

## माणगाव नगरपंचायतीच्या चार जागांसाठी १० उमेदवार, प्रशासन सज्ज



**माणगाव : प्रतिनिधी**

येथील नगरपंचायतीच्या चार जागांसाठी मंगळवारी (दि. १८) निवडणूक असून त्यासाठी प्रशासन सज्ज झाले आहे. निवडणूक होत असलेल्या चार वार्डात एकूण ३३२५ मतदार असून, त्यामध्ये १६९५ पुरुष आणि १६३० महिला मतदार आहेत. शहरातील चार मतदान केंद्रात ही मतदान प्रक्रिया पार पडणार आहे.

माणगाव नगरपंचायतीचे एकूण १७ वार्ड व १७ नगरसेवक आहेत. त्यापैकी १३ जागांसाठी यापूर्वीच २१ डिसेंबर रोजी मतदान घेण्यात आले असून उर्वरित वार्ड क्र. ६, ८,१४ व १७ या वार्डांत आज मतदान होत आहे.

नगरपंचायतीच्या वार्ड क्र.६ मध्ये हर्षदा सतीश सोंडकर आणि स्नेहा नितीन दसवते यांच्यात तर वार्ड क्र. ८ मध्ये नंदिनी नितीन बामगुडे आणि चेतना मंगेश निंबाळकर यांच्यात सरळ लढत होणार आहे.

वार्ड क्र.१४ मध्ये मयूर दिलीप शेट, सचिन मारुती बोंबले आणि राजा गौरू भोनकर तर वार्ड क्र.१७ मध्ये दिनेश बाळकृष्ण रातवडकर, महामूद फकरुद्दीन धुंदवारे, रवींद्र भिकू मोरे यांच्यात तिरंगी लढत आहे. मतदानाकरिता तीन पोलीस अधिकारी आणि ३७ पोलीस कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात आली आहे.

माणगाव नगरपंचातीच्या एकूण १७ जागांची मतमोजणी बुधवारी (दि. १९) जानेवारीला सकाळी १० वाजल्यापासून सुरु होणार आहे.

## आंदोशी येथे सात जणांच्या हल्ल्यात तिघे जखमी

**रेवदंडा : प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यात वरंडे ग्रामपंचायत हद्दीतील आंदोशी येथे क्षुल्लक कारणावरून झालेल्या भांडणाचा राग मनात धरून सात जणांनी केलेल्या हल्ल्यात तिघे जण जखमी झाले.

आंदोशी येथे दीपक चेरकर यांनी महेंद्र सुरेश पाटील हे नव्याने बांधलेल्या संरक्षक भिंतीला पाणी मारत असताना ते खिडकीतून घरात येत असल्याने आंदोशी येथील दीपक चेरकर यांनी पाणी सावकाश मार, माझ्या घरात येत आहे, असे सांगितले. त्याचा राग येऊन सुरेश पाटील यांनी दीपक चेरकर यांना शिवीगाळ केली तसेच त्यांच्यासह सात जणांनी एकत्र येऊन लाकडी काठ्या, लोखंडी रॉडने मारहाण केली. त्यांची पत्नी दिपश्री चेरकर हिला रिध्दी पाटील व सुरेख पाटील यांनी काठीने मारहाण केली. या वेळी भांडण सोडविण्यास गेलेल्या आई शारदा चेरकर यांनाही काठीने मारहाण करण्यात आली. या वेळी झालेल्या झटापटीत दिपश्री चेरकर यांच्या नाकातील चमकी गहाळ झाली अशी तक्रार दीपक चेरकर यांनी रेवदंडा पोलीस ठाण्यात दिली आहे. पुढील तपास हवालदार पिंपळे करीत आहेत.

## गोवंश मांस विक्रीसाठी नेणारी टोळी नागोठण्यात जेरबंद

**नागोठणे : प्रतिनिधी**

गोवंश जातीच्या प्राण्यांची बेकायदेशीरपणे कत्तल करून ते मांस अवैधरीत्या मुंबई येथे विक्रीसाठी नेणाऱ्या पाच जणांच्या टोळीला नागोठणे पोलिसांनी रविवारी (दि. १६) जेरबंद केले आहे. त्यात नागोठणे येथील तिघांचा समावेश आहे.

नागोठणे पोलीस ठाण्याचे उपनिरीक्षक नारायण चव्हाण हे आपल्या पथकांसह रात्रीची गस्त घालत घालत असतानाच रविवारी पहाटेच्या सुमारास एक पिकप जीप आणि टाटा इंट्रा कंपनीचा छोटा टेम्पो संशयास्पदरीत्या आढळून आली. या दोन्ही वाहनांची तपासणी केली असता त्यामध्ये एकूण २५० किलो वजनाचे व सुमारे एक लाख ९० हजार रुपये किमतीचे प्राण्यांचे तुकडे केलेले मांस आढळून आले. याशिवाय या वाहनांच्या बाजूला सुमारे चोवीस हजार रुपये किमतीच्या तीन गायी आढळून आल्या. याशिवाय घटनास्थळी एक इलेक्ट्रॉनिक वजन काटा, एक लोखंडी सुरा सापडला. या गुन्ह्यात एकूण सहा लाख ५८ हजार ७३० रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी घटनास्थळी हस्तगत केला.

या गुन्ह्यात सलीम सिंधी (वय ५२, रा. आझाद मोहल्ला, नागोठणे), इम्रान मुल्ला (वय ३६) व नबाब शेख (वय २३, दोन्ही रा. मिरानगर, नागोठणे), चालक विजय आरोट (वय २५, रा. रमाई कॉलनी, घाटकोपर–मुबई), नदीम कुरेशी (वय २८, रा. टाटानगर, गोवंडी–मुबई) या पाच आरोपींना अटक करण्यात आली आहे. त्यांच्यावर नागोठणे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास उपनिरीक्षक नारायण चव्हाण करीत आहेत.


पोलीस उपनिरीक्षक नारायण चव्हाण, उपनिरीक्षक स्वप्नील सावंत देसाई, हेड कॉन्स्टेबल नितीन गायकवाड, ब्रिजेश भायदे, पोलीस नाईक मिथून मातेरे, सत्यवान पिंगळे, कॉन्स्टेबल रामनाथ ठाकूर यांच्या पथकाने ही कामगिरी बजावली.

### पेण येथील अल्पवयीन मुलीवर बलात्कार आणि खून प्रकरण

## अलिबाग विशेष पोस्को न्यायालयात सुनावणी सुरू

**अलिबाग : प्रतिनिधी**

पेण तालुक्यातील मळेघर आदिवासीवाडीतील तीन वर्षीय मुलीवर शारीरिक अत्याचार करून तिला जीवे मारण्याची घटना २९ डिसेंबर २०२० साली घडली होती. या प्रकरणाच्या खटल्याची सुनावणी विशेष पोस्को न्यायालयात सोमवार (दि. १७) पासून सुरू झाली. विशेष सरकारी वकील अ‍ॅड. उज्वल निकम यांनी तक्रारदार आणि पंच यांची साक्ष तपासली असून आरोपी पक्षाकडूनही उलट तपासणी घेण्यात आली आहे. १४ ते १६ फेब्रुवारी असे सलग तीन दिवस या खटल्याची सुनावणी सुरू राहणार असून १५ साक्षीदार तपासणार असल्याची माहिती जिल्हा सरकारी वकील अ‍ॅड. भूषण साळवी यांनी दिली आहे.





मळेघर आदिवासीवाडीमधील तीन वर्षीय मुलीवर अत्याचार करून तिची निर्घृण हत्या करण्यात आली होती. या घटनेनंतर जिल्ह्यात संतापाचे वातावरण निर्माण झाले होते. जिल्हा पोलिसांनी या घटनेचा तपास करून आरोपी आदेश पाटील याला अटक केली. आरोपी हा गुन्हेगारी प्रवृत्तीचा असून अलिबाग येथे शिक्षा भोगत होता. पॅरोलवर तो घरी आला असता त्याने हे कृत्य केले. पेण पोलीस ठाण्यात आरोपी विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला होता. हा गुन्हा जलदगती न्यायालयात चालविण्याची मागणी राजकीय तसेच सामाजिक संघटनांनी केली होती. या खटल्यासाठी विशेष सरकारी वकील म्हणून राज्य शासनाने अ‍ॅड. उज्वल निकम याची नियुक्ती केली आहे. जिल्हा सरकारी वकील अ‍ॅड. भूषण साळवी हे सहाय्यक म्हणून काम पाहत आहेत.

पेण पोलिसांनी आरोपी विरोधात अलिबाग येथील पोस्को न्यायालयात खटला दाखल केला आहे. सोमवारी या खटल्याची सुनावणी न्या. शहिदा शेख याच्यासमोर झाली. सरकार पक्षातर्फे तक्रारदार आणि पंच याची तपासणी साक्ष घेण्यात आली. आरोपी पक्षातर्फेही उलट तपासणी घेण्यात आली.

# एन. डी. पाटील... नेता नव्हे एक विचार!

**एन. डी. पाटील... आयुष्यभर शेतकरी आणि कष्टकरी लोकांशी बांधिलकी मानून काम करणारा हा लोकनेता. एकाच वेळी अनेक संस्थांचे नेतृत्व करत असताना त्या संस्थांचा कारभार आदर्श रीतीने झाला पाहिजे अशी त्यांची भूमिका राहिली.**



एन. डी. पाटील महाराष्ट्राचे सहकार मंत्री होते तेव्हाची गोष्ट.एका सकाळी त्यांच्याकडे एक माणूस भेटायला आला. बंगल्यावर कोणीही कर्मचारी नव्हता. तो माणूस सरळ आत गेला. बैठकीच्या खोलीत बसला. बराच वेळ कोणी बाहेर येईना, म्हटल्यावर तो ज्या दिशेने कपडे धुण्याचा आवाज ऐकू येत होता, तिकडे चौकशी करायला गेला. तेव्हा एन डी पाटील त्याला तिथे कपडे धूत बसलेले दिसले. त्या माणसाची चाहूल लागल्यावर त्यांनी वळून बघितलं आणि म्हणाले, तुम्ही माझ्याकडे आलाय का? जरा थांबा. आलोच मी. आज सुट्टी होती म्हणून कपडे धूत होतो,'' तो माणूस ते दृश्य पाहून बघतच राहिला. कारण महाराष्ट्राचे सहकारमंत्री स्वतः चे कपडे धूत, आहेत हे त्याच्या दृष्टीने धक्कादायक होतं.

शेतकरी कामगार पक्षाचे जेष्ठ नेते एन डी पाटील यांच्याबाबतीतला हा एक प्रसंग. असे अनेक प्रसंग सांगता येतील.त्यांचे कार्यकर्ते असे घडलेले प्रसंग सांगतात. एन डी पाटील यांनी कोल्हापूरात एक आंदोलन केलं. कोरोनाच्या काळातील घरगुती वीज बिलाची होळी करणारं हे आंदोलन. वयाची नव्वदी ओलांडली आहे.दोन्ही पायांना त्रास आहे. चालता येत नाही. पायांना अपघातात इजा झालीय. चालता येत नाही म्हणून घरात बसणारा हा नेता नाही. लढणं माहिती आहे. सरकार कोणाचेही असो. सरकारी धोरणं श्रमिकांच्या हिताच्या विरोधात निघाली की एन डी पाटील रस्त्यावर आलेच. लडेंगे जितेंगे ही त्यांची आवडती घोषणा.ती त्यांच्याच बुलंद आवाजात ऐकायला पाहिजे. आंदोलन बघत उभा असलेल्या बघ्या माणसालाही त्या आंदोलनात सहभागी व्हावं असच वाटते.

सांगली जिल्ह्यातील ढवळी हे वाळवा तालुक्यातील एन डी यांच गाव. शाळकरी वयात असतानाच सत्यशोधक विचार ऐकायला मिळाले. पुढे कर्मवीर भाऊराव पाटील यांची भेट झाली. मग रयत शिक्षण संस्थेशी जवळून संबंध आला. प्राध्यापक म्हणून रुजू झाले. याच दरम्यान त्यांनी नोकरी सोडून पूर्णवेळ शेतकरी कामगार पक्षासाठी द्यायचा निर्णय घेतला. जीवनदानी कार्यकर्ते बनले. नंतर शेतकरी कामगार पक्षाचा विचार तळागाळापर्यंत पोहोचवण्यासाठी त्यांनी काम केले. शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने ते विधानपरिषदेवर गेले.

आपल्या अभ्यासपूर्ण भाषणांनी सभागृह दणादूण सोडले. उपेक्षित लोकांच्या प्रश्नांची सभागृहात चर्चा केली, प्रश्न सोडवले. १८ वर्षे या सभागृहात त्यांनी काम केले. १९७८ साली त्यांना पुलोद सरकारमध्ये सहकारमंत्री म्हणून काम करण्याची संधी मिळाली. या खात्याचे मंत्री म्हणून त्यांनी केलेल्या कामकाजाची आजही चर्चा होते. कापूस उत्पादक शेतकऱ्यांना फायद्याची ठरलेली कापूस एकाधिकार योजना त्यांनीच सुरू केली. मंत्री असताना कोणत्याही भूमिपूजन कार्यक्रमाला न जाण्याचा निर्णय त्यांनी घेतला आणि अंमलात आणला. एन डी पाटील यांच्यासमोर महात्मा फुले आणि कर्मवीर भाऊराव पाटील यांचा आदर्श होता, त्याच आदर्शाने ते आयुष्यभर वागले. सत्तेत जायची संधी मिळाली, पण तेव्हाही त्यांच्या जगण्यात आणि साधेपणात काहीही फरक पडला नाही.



ते जेव्हा सहकारमंत्री होते. तेव्हा त्यांच्या मुलाला सुहास यांना मेडिकलला प्रवेश घ्यायचा होता. एक दोन गुण कमी होते. त्यांनी त्यांचे मामा शरद पवार मुख्यमंत्री होते,वडील एन डी पाटील सहकारमंत्री होते.पण त्यांचा वशिला न लावता रांगेत उभा राहून इंजिनिअरिंगला प्रवेश घेतला.वडिलांचा व्यवसाय या रकान्यात त्यांनी शेती असे लिहिले. पण मामा किंवा वडील यांची ओळख सांगितली नाही.' अशी आठवण एन डी यांच्या पत्नी सरोजमाई सांगतात.

आयुष्यभर शेतकरी आणि कष्टकरी लोकांशी बांधिलकी मानुन काम करणारा हा लोकनेता. एकाचवेळी अनेक संस्थांचे नेतृत्व करत असताना त्या संस्थाचा कारभार आदर्श रीतीने झाला पाहिजे अशी त्यांची भूमिका राहिली आहे.

एन. डी. पाटील आमदार झाले त्या दिवसापासून आजअखेर आपल्या मानधनातील रक्कम गरीब कार्यकर्त्यांना देतात. अडचणीत असलेल्या कार्यकर्त्याला हातभार लावणारा महाराष्ट्रातील हा एकमेव नेता असेल. त्यांच्याबद्दल अनेक गोष्टी सांगण्यासारख्या आहेत. एन. डी. हे एका नेत्याचं नाही तर एका विचाराचं नाव आहे. एन. डी. पाटील हे एक वादळ होते. लढणं या माणसाच्या रक्तात होतं. एन. डी. चा दुसरा समानार्थी शब्द संघर्ष होता. आता हा संघर्ष थांबला.

**सौजन्य : संपत मोरे**


## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येत आहे की, १) श्री. वामन कमळू पाटील २) श्री. भगवान शंकर पाटील ३) श्री. जयदास शंकर पाटील ४) श्रीमती इंदूबाई भरत म्हात्रे ५) श्रीमती चांगुणा हरिश्चंद्र भगत ६) श्रीमती नंदा भाऊ फडके ७) श्रीमती जनाबाई उर्फ कांचन मदन पाटील ८) श्री. धर्मा पांडुरंग पाटील ९) श्रीमती बेबी धाऊ पाटील १०) श्री. विष्णू धाऊ पाटील ११) श्री. शरद धाऊ पाटील १२) श्री. किरण धाऊ पाटील १३) श्रीमती गंगुबाई दिनकर म्हात्रे १४) श्रीमती निकिता विनायक भूसारी १५) श्रीमती शशिकला हरिश्चंद्र चौधरी यांच्या नावे असलेले मौजे शिवकर, तालुका पनवेल, जिल्हा रायगड येथील खालील वर्णनाची जमीन मिळकत आमचे अशिलांनी विकत घेण्याचे ठरविलेले आहे.

**जमीन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्रफळ (हे.आर.) |
|---|---|---|
| २६० | | ०–३४–६० |
| २७५ पो.ख. | | ०–८८–०<br>०–०४–३०<br>पैकी ०–३३–०० |
| | एकूण खरेदीचे क्षेत्र | ०–६७–६० |

सबब सदर जमीन मिळकतीवर किंवा सदर मिळकतीच्या कोणत्याही भागावर कोणाचेही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, तारण, भाडेपट्टा, साठेखत, अखत्यारपत्र, एम.ओ.यू. किंवा तत्सम कोणतेही दावे मालकी व अन्य हक्क, हितसंबंध असलेल्या व्यक्तींनी किंवा संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन २१ दिवसांच्या आत आपल्या हक्क हितसंबंधांचे स्वरूप विषद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्त्यावर लेखी कळवावे अगर समक्ष येऊन भेटावे. वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, व बोजारहित असुन त्यावर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजुन माझे अशिल सदर मिळकतीच्या व्यवहाराचे पुढील काम पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही तक्रारी, दावे, हरकती रद्दबातल आहेत किंवा त्या सोडून दिलेल्या आहेत असे गृहीत धरले जाईल याची तमाम जनतेने नोंद घ्यावी.

**सही/–**
**वकील श्री. किशोर कान्हा पाटील**

**कार्यालयीन पत्ता :** गाळा क्रमांक १०९, पहिला मजला, नगरपालिका शॉपिंग कॉम्प्लेक्स, ओल्ड पनवेल, तालुका पनवेल, जिल्हा रायगड ४१०२०६. संपर्क – ९६१९११२१५५

# रोहित शर्मा नवा कसोटी कर्णधार?



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

विराटने अचानक कर्णधारपदाचा राजीनामा दिला आणि सर्वांनाच मोठा धक्का बसला. विराटनंतर कर्णधार निवडण्यासाठी बीसीसीआयसमोर बरेच पर्याय होते, त्यामध्ये रोहित शर्मा, लोकेश राहुल, अजिंक्य रहाणे, आर. अश्विन यांच्या नावाचा विचार झाला होता, पण या चौघांमधून आता बीसीसीआयने एकाची निवड केली आहे. सध्याची परिस्थिती पाहता या चौघांपैकी रोहित शर्माच्या नावावर बीसीसीआयने शिक्कामोर्तब केल्याचे वृत्त 'इनसाईड स्पोर्ट्स'ने बीसीसीआय अधिकाऱ्याच्या हवाल्याने दिले आहे. त्यामुळे आता रोहित हा भारताचा कर्णधार होईल, असे दिसत आहे. फक्त काही महिन्यांमध्येच रोहित शर्माकडे भारताच्या तिन्ही संघांचे कर्णधारपद येऊ शकते. पण बीसीसीआय सध्या तरी भारताच्या नवीन कसोटी संघाच्या कर्णधाराची घोषणा करणार नाही. दक्षिण आफ्रिकेतील एकदिवसीय मालिका संपल्यावर बीसीसीआय भारताच्या कसोटी कर्णधारपदाची घोषणा करू शकते. कदाचित भारतीय संघ मायदेशात परतल्यावर या गोष्टीची घोषणा करण्यात येऊ शकते. कारण त्यानंतर निवड समिती श्रीलंकेविरुद्धच्या कसोटी मालिकेसाठी संघ निवडणार आहे. त्याचवेळी भारताच्या नवीन कर्णधाराची घोषणा करण्यात येऊ शकते.

येत्या काही दिवसांमध्ये भारताचा नवीन कसोटी कर्णधार कोण असणार आहे, ते स्पष्ट होईल. विराटने त्याच्या कर्णधारपदाच्या करिअरचा शेवट पराभवाने केला. त्यामुळे विराटच्या राजीनाम्याचे टायमिंग चुकले, अशी प्रतिक्रिया काही चाहत्यांनी व्यक्त केली आहे.

## कर्णधारपद सोडण्यापूर्वी बीसीसीआयने विराटला दिली होती 'अशी' ऑफर!

नवी दिल्ली : वृत्तसंस्था

दक्षिण आफ्रिकेविरुद्ध कसोटी मालिका १-२ने गमावल्यानंतर विराट कोहलीनेही भारताच्या कसोटी कर्णधारपद सोडले. जेव्हा विराट कोहलीने बीसीसीआयला फोनवर कसोटी कर्णधारपद सोडण्याच्या निर्णयाची माहिती दिली. त्यानंतर बीसीसीआयच्या एका उच्चपदस्थ अधिकाऱ्याकडून त्याला कसोटी कप्तान म्हणून बंगळुरूमध्ये फेअरवेल मॅच खेळण्याची ऑफर दिली होती. याला प्रत्युत्तर देताना कोहली म्हणाला, एका सामन्याने काही फरक पडत नाही.

विराट हा सर्वात यशस्वी कसोटी कर्णधार होता.



त्याच्या नेतृत्वाखाली टीम इंडियाने सर्वाधिक ४० कसोटी जिंकल्या. दिग्गज क्रिकेटपटू महेंद्रसिंह धोनीने कसोटी क्रिकेटमधून अचानक निवृत्ती घेतल्यानंतर कोहलीला संघाची कमान देण्यात आली होती. त्याच्या नेतृत्वाखाली टीम इंडिया पाच वर्षे कसोटीतील सर्वोत्तम संघ होता. इतके यश मिळवूनही कोहलीने अचानक निवृत्ती घेऊन सर्वांना चकीत केले. कसोटी कर्णधारपद सोडण्यापूर्वी कोहलीला बीसीसीआयने फेअरवेल मॅच खेळण्याची ऑफर केली होती.

३३ वर्षीय विराट बंगळुरूमध्ये श्रीलंकेविरुद्ध १००वी कसोटी खेळू शकतो. श्रीलंकेचा संघ फेब्रुवारीमध्ये भारतात येत आहे. दोन्ही देशांदरम्यान २ कसोटी आणि ३ टी-२० सामन्यांची मालिका खेळवली जाणार आहे. पहिला कसोटी सामना २५ फेब्रुवारीपासून बंगळुरू येथे खेळवला जाणार आहे. विराट या कसोटीत खेळला, तर त्याची ही १००वी कसोटी असेल.

## न्यायालयाने अर्ज फेटाळल्यामुळे जोकोव्हिच स्पर्धेला मुकणार

**मेलबर्न : वृत्तसंस्था**

ऑस्ट्रेलियातील केंद्रीय न्यायालयाने परत पाठवणी विरोधातील अर्ज फेटाळल्याने प्रचंड निराशा झाल्याची कबुली विश्वातील अव्वल टेनिसपटू नोव्हाक जोकोव्हिचने रविवारी (दि. १६) दिली. करोना प्रतिबंधात्मक लसीचे दोन्ही डोस न घेताच ऑस्ट्रेलियात दाखल झालेल्या सर्बियाच्या जोकोव्हिचचा व्हिसा ऑस्ट्रेलियाचे परकी नागरिकविषयक खात्याचे मंत्री (इमिग्रेशन मिनिस्टर) अ‍ॅलेक्स हॉक यांनी शुक्रवारी रद्द केला होता.

या निर्णयाविरोधात त्याने दाद मागितली, मात्र रविवारी केंद्रीय न्यायालयाच्या तिन्ही न्यायाधीशांनी एकमताने जोकोव्हिचच्या विरोधात निकाल दिला. हॉक यांनी उचललेले पाऊल हे 'तर्कहीन किंवा कायदेशीरदृष्ट्या अवास्तव' होते का, याबाबत विचार केल्यानंतर आम्ही जोकोव्हिचचा व्हिसा रद्द करण्याचा निर्णय कायम ठेवल्याचे सरन्यायाधीश जेम्स ऑलसोप यांनी स्पष्ट केले. केंद्रीय न्यायालयाच्या या निर्णयानंतर जोकोव्हिचला उच्च न्यायालयात दाद मागण्याची मुभा होती, मात्र ऑस्ट्रेलियन खुल्या टेनिस स्पर्धेला केवळ एका दिवसाचा अवधी असल्याने त्याने केंद्रीय न्यायालयाचा निर्णय स्वीकारला.

## आयर्लंडने घडवला इतिहास

### वेस्ट इंडिजवर दोन गडी राखून विजय

**किंग्सटन : वृत्तसंस्था**

वेस्ट इंडिज दौऱ्यावर गेलेल्या आयरर्लंड संघाने इतिहास घडवला. रविवारी (दि. १६) किंग्सटन येथे झालेल्या तिसऱ्या वनडे सामन्यात त्यांनी यजमान वेस्ट इंडिजचा दोन गडी राखून पराभव केला. या विजयासह त्यांनी मालिका देखील २-१ने जिंकली. अँडी मॅकब्रायनने चार विकेटसह अर्धशतकी खेळी केली.

आयसीसीच्या पूर्णवेळ देशाच्या विरुद्ध परदेशात विजय मिळवण्याची आयरर्लंड संघाची ही पहिलीच वेळ आहे, तर पूर्ण वेळ सदस्य असलेल्या देशाविरुद्ध मिळवलेला हा त्यांचा दुसरा विजय आहे. २०१९ साली त्यांनी झिम्बाब्वेविरुद्ध



मालिका जिंकली होती.

टॉस गमावलेल्या वेस्ट इंडिजचा डाव ४४.४ षटकात फक्त २१२ धावा संपुष्टात आला. विकेटकीपर आणि फलंदाज शाई होपने ३९ चेंडूत ५३ धावा केल्या. तर अनुभवी जेसन होल्डरने ४४ धावा केल्या. मॅकब्रायने चार तर क्रेगने तीन विकेट घेतल्या. उत्तरादाखल आयरर्लंडने ४४.५ षटाकत ८ विकेटच्या बदल्यात २१४ धावा केल्या. मॅकब्रायनने १०० चेंडूत ६ चौकार आणि १ षटकारांच्या मदतीने ५९ धावा केल्या. हॅरी टॅक्टरने ५२ तर पॉल स्टर्लिंगने ४४ धावांचे योगदान दिले.

या मालिकेत आयरर्लंडने पहिली लढत गमावली होती. त्यानंतर दोन लढतीत विजय मिळवून विजय साकारला. पहिल्या वनडेत वेस्ट इंडिजने २४ धावांनी विजय मिळवला होता. दुसरी लढत आयरर्लंडने डकवर्थ लुईस नियमानुसार पाच विकेटनी जिंकला होता.

## श्रेयस अय्यर होणार आरसीबीचा कर्णधार?

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

विराट कोहलीने नुकतीच कसोटी संघाचे नेतृत्व सोडले. यापूर्वी त्याने टी-२० संघाचे आणि रॉयल चॅलेंजर बंगळुरूचेही नेतृत्व सोडले होते. त्यामुळे आयपीएलच्या पुढच्या हंगामात आरसीबीचा नवा कॅप्टन कोण असणार याची चर्चा सुरू झाली आहे. त्यात अचानकपणे श्रेयस अय्यरचे नाव पुढे येत आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार रॉयल चॅलेंजर बंगळुरूचा नवा कर्णधार श्रेयस अय्यर असू शकतो.

सूत्रांनी सांगितले की, विराट कोहलीने आरसीबीचे नेतृत्व सोडल्यानंतर आरसीबीने श्रेयस अय्यरमध्ये खूप रस दाखवला आहे. त्यांना आरसीबीची धुरा श्रेयस अय्यरकडे सोपवायची आहे. त्यामुळे पुढच्या महिन्यात बंगळुरूमध्ये होणाऱ्या आयपीएल मेगा ऑक्शनमध्ये आरसीबी श्रेयस अय्यरसाठी आक्रमकपणे बोली लावण्याची शक्यता आहे.

कोलकाता नाईट रायडर्स आणि पंजाब किंग्जदेखील श्रेयसवर नजर ठेवून आहेत. अय्यरला देखील आता ज्या फ्रेंचायजीकडून खेळणार आहे त्याचा कर्णधार होण्याची इच्छा आहे. दिल्ली कॅपिटल्सने श्रेयस अय्यर दुखापतग्रस्त झाल्यानंतर ऋषभ पंतला कर्णाधार केले होते. त्यानंतर श्रेयस अय्यरने दिल्ली कॅपिटल्सला राम राम ठोकला. त्यानंतर लखनौ आणि अहमदाबादच्या संघाकडेही तो गेला नाही कारण दोन्ही संघ त्याला कर्णधार करणार नव्हते.



**पनवेल : महापालिकेचे नगरसेवक निलेश बावीस्कर यांनी नवीन वर्षानिमित्त २०२२ सालची दिनदर्शिका प्रकाशित केली आहे. या दिनदर्शिकेचे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते सोमवारी प्रकाशन झाले. या वेळी भाजपचे वॉर्ड अध्यक्ष आनंता मोकाशी, बुथ अध्यक्ष विश्वनाथ आयंडी, ज्येष्ठ नागरिक संस्थेचे अध्यक्ष मार्तंड सोनावणे, सोशल मीडिया सेलच्या सरचिटणीस कंचन बिर्ला, आशा मोरे, माळी मॅडम, संदीप घोरा आदी उपस्थित होते.**



## कर्णधारपद हा कुणाचा जन्मसिद्ध हक्क नाही -गंभीर

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

तुम्हाला नवीन काय पाहायचे आहे? कर्णधारपद हा कुणाचा जन्मसिद्ध हक्क नाही. धोनीसारख्या खेळाडूने विराट कोहलीला कर्णधारपद दिले. तो विराट कोहलीच्या नेतृत्वाखाली खेळला आहे. त्याने तीन आयसीसी ट्रॉफी आणि चार आयपीएल ट्रॉफीही जिंकल्या आहेत, असे गौतम गंभीर एका प्रश्नाला उत्तर देताना म्हणाला. स्टार स्पोर्ट्स शो गेम प्लॅनवरील चर्चेदरम्यान, गौतम गंभीरला विचारण्यात आले की आपण नवीन कोहलीला पाहणार आहोत का? यावर त्याने हे उत्तर दिले.



**उरण : आमदार प्रशांत ठाकूर यांनी चिर्ले येथे भेट देऊन हुतात्मा नामदेव शंकर घरत यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.**

## केएल राहुलच्या नेतृत्वाखाली वनडेसाठी भारतीय संघाचे सराव सत्र

**पार्ल : वृत्तसंस्था**

भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यात १९ जानेवारीपासून तीन सामन्यांची वनडे मालिका खेळवली जाणार आहे. या मालिकेतील पहिले दोन सामने पार्लमध्ये, तर शेवटचा सामना केपटाऊनमध्ये खेळवला जाईल. यासाठी टीम इंडियाने तयारी सुरू केली आहे. टीम इंडियाचे खेळाडू पार्लच्या बोलंड पार्कमध्ये जमले आणि त्यांनी सराव सत्रात भाग घेतला. भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने भारतीय खेळाडूंचे फोटो शेअर केले आहेत.

कसोटी कर्णधारपदावरून पायउतार झाल्यानंतर विराट कोहलीचे प्रथमच समोर आला आहे. यामध्ये तो विराट श्रेयस अय्यर आणि शार्दुल ठाकूरसोबत उभा आहे. एकदिवसीय मालिकेसाठी केएल राहुलला कर्णधार बनवण्यात आले आहे. रोहित शर्मा दुखापतीमुळे मालिका खेळत नाही. बीसीसीआयने शेअर केलेल्या फोटोंमध्ये राहुल भारतीय संघाशी संवाद साधताना दिसत आहे, तर विराटसह इतर खेळाडू त्याचे म्हणणे ऐकून घेत आहे.

वनडे कर्णधार म्हणून केएल राहुलची ही पहिलीच आंतरराष्ट्रीय मालिका आहे. याआधी जोहान्सबर्गमध्ये झालेल्या दुसऱ्या कसोटी सामन्यात त्याने दक्षिण आफ्रिकेविरुद्ध कर्णधारपद भूषवले होते, मात्र या सामन्यात टीम इंडियाला पराभवाचा सामना करावा लागला होता. दुखापतीमुळे कोहलीच्या अनुपस्थितीत तो कर्णधार झाला. केएल राहुलच्या कर्णधारपदाची खरी कसोटी वनडे मालिकेत असेल.




## राम प्रहर अर्थसाक्षर स्पर्धा : ४


**अर्थसाक्षर स्पर्धेचे तीन प्रश्न खाली दिले आहेत.**

**वाचक स्पर्धकांनी निवडलेली बरोबर उत्तरे पुढील पाच दिवसांत म्हणजेच गुरुवारी रात्री ८ वाजेपर्यंत 'राम प्रहर'च्या ७७३८१०६००९ या मोबाईल क्रमांकावर कळवावी (व्हॉट्सअ‍ॅप, मेसेज अथवा malharnetwork2022@gmail.com यावर मेल केले तरी चालेल).**

**१. मोबाईल सेवा पुरविणारी भारतातील सर्वात मोठी कंपनी कोणती आहे?**
***अ.)*** जिओ ***ब.)*** भारती एअरटेल ***क.)*** व्होडाफोन आयडिया ***ड.)*** टाटा टेलिकम्युनिकेशन

**२. पुढीलपैकी कोणती संस्था शेअर बाजाराशी संबंधित नाही?**
***अ.)*** सेबी (सेक्युरिटीज अ‍ॅड एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडिया)
***ब.)*** सीडीएसएल (सेन्ट्रल डीपॉजिटरी सर्व्हिसेस इंडिया लिमिटेड)
***क.)*** आयइएक्स (इंडिया एनर्जी एक्सचेंज)
***ड.)*** बीएसई (बॉम्बे स्टॉक एक्स्चेंज)

**३. भारतीय शेअर बाजारात या क्षेत्रातील कंपन्यांचे मूल्य सध्या (डिसेंबर २०२१) सर्वाधिक आहे.**
***अ.)*** बँक ***ब.)*** आयटी ***क.)*** एफएमसीजी ***ड.)*** एनर्जी




**टीप : वरील तीनही प्रश्नांची अचूक उत्तरे देणाऱ्या वाचकांमधून पहिल्या तीन क्रमांकांची निवड संगणक प्रणालीने करण्यात येईल. या तीनही विजयी वाचकांना पनवेल, टपाल नाका येथील 'ई-स्टोर इंडिया'तर्फे गिफ्ट व्हाऊचर्स देण्यात येतील, तसेच सर्व विजयी वाचक स्पर्धकांची नावे पुढील रविवारी अर्थ प्रहर सदरात जाहीर करण्यात येतील.**

**...तर मग चला लागा तयारीला आणि अर्थसाक्षर स्पर्धेत यशस्वी व्हा.**

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com